पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध

RNINO.MAHMAR/2013/57952

शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ | वर्ष : १३ | अंक : ३०१ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com



आतील पानात...

३ तरुणीच्या अपहरणाने भिगवण पेटल

४ त्रिमूर्ती विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

५ छत्रपती शिवरायांच्या विचारांचा आदर्श युवकांनी घ्यावा



पान ८ वर




# छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती शिवरायांची ४०० वी जयंती जागतिक स्तरावर भव्य दिव्य साजरी करणार

जनप्रवास : प्रतिनिधी

नारायणगाव : छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

शिवजन्मभूमी किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, आशाताई बुचके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले. अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या आधीपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे





माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांप्रती विचार मांडले. शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत श्री. फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदींच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

### शिवरायांच्या विचारावर चालणारा यशस्वी महाराष्ट्र घडवू- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली , यशस्वी व स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण व पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षांपूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांनी आणली. राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येणार आहे.

स्त्रीसन्मानाची परंपरा जपत 'लाडकी बहीण' योजनेद्वारे महिलांना सक्षम करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जुन्नर तालुका व शिवनेरी किल्ला परिसराच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### शिवनेरी किल्ला विचार आणि कार्याचे प्रेरणास्थळ-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

श्रीमती पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी किल्ला, ही शिवजन्मभूमी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, तर ते त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळही होते.

पवित्र शिवनेरी किल्ल्याविषयी केवळ जिव्हाळाच नव्हता, तर या शिवजन्मभूमीचे सौंदर्य वाढावे, तिचा ऐतिहासिक वारसा जपला जावा आणि भावी पिढ्यांना अभिमानाने दाखवता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला आणि या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला.

## संक्षिप्त

### रिअल इस्टेट व्यावसायिकाच्या डोक्यात हत्याराने वार

पुणे (जनप्रवास) : रिअल इस्टेट व्यावसायिक मित्रांबरोबर मध्यरात्री गप्पा मारत बसले असताना तिघा जणांच्या टोळक्याने येऊन आम्ही पाषाणचे बाप आहोत, तुला मारुन टाकतो, असे म्हणून तरुणावर लोखंडी हत्याराने वार करुन गंभीर जखमी केले. याबाबत सौरभ धनंजय जाधव (वय २६, रा. जय भवानी निवास, जय भवानीनगर, पाषाण) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन पोलिसांनी संस्कार दीपक निम्हण (वय १९, रा. सिल्वर मुन सोसायटी, बावधन), संग्राम राहुल ढमाले (वय २०, रा. बाणेर गावठाण, बाणेर), अमर चौधरी (वय १९, रा. पाषाण) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार पाषाण गावातील विठ्ठलनगर येथे १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री साडेबारा वाजता घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ जाधव यांचा मिनाक्षी इंटरप्रायझेस नावाने रिअल इस्टेटचा व्यवसाय आहे. ते व त्यांचा मित्र नागेश कांबळे हे विठ्ठलनगर येथील गणेश मंदिराशेजारी मध्यरात्री गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी तिघे जण मोटारसायकलवरुन आले. त्यांना पाहून जोरजोरात शिवीगाळ करत त्यांच्याजवळून निघून गेले. पुढे जाऊन पुन्हा वळून जाधव यांच्याजवळ आले. त्यांच्यातील संस्कार निम्हण म्हणाला की, आम्ही पाषाणचे बाप आहे, आज तुला मारुन टाकतो, अशी धमकी दिली.

### बनावट कागदपत्रे दाखवून शस्त्र परवाना

पुणे (जनप्रवास) : डोणजे येथे राहणार्या गुन्हे नावावर असतानाही लोणी काळभोरमधील पत्ता देऊन शस्त्र परवाना मिळविणार्या गुन्हेगारावर बनावट कागदपत्रे दाखवून फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहित ऊर्फ बाळा किसन भामे (वय २२, रा. डोणजे, ता. हवेली) असे या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. शासकीय ठेकेदार विठ्ठल पोळेकर यांचा खुन केल्याप्रकरणात सध्या तो कारागृहात आहे. गँगस्टर नीलेश घायवळ याच्यासह अनेक गुंडांनी बनावट कागदपत्रे देऊन मधल्या काळात शस्त्र परवाने मिळविले होते. या सर्व शस्त्र परवान्यांची सध्या चौकशी करण्यात येत आहे. त्यातून हा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत पोलीस अंमलदार तेज भोसले यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## वनविभागाची कारवाई : सांबराच्या शिंगांसह दोघे वनतस्कर जेरबंद

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : खवल्या मांजराच्या खवल्यांसह सांबराच्या शिंगांची तस्करी करणाऱ्या टोळीवर आंबेगाव तालुक्यातील मंचर वन विभागाने कारवाई करीत दोघांना अटक केली. उदय शंकर सुर्वे (रा. शिस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) व नवीन करीम खान (रा. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघा वनतस्करांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध वनपरिमंडळ मंचर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी मंचर यांना खवले मांजर व सांबर यांच्या अवयवांची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वन विभागाच्या पथकाने मंचर येथील मोरडे फुड्स कंपनीजवळील झटका खानावळीच्या मागील परिसरात सापळा रचला.

दरम्यान, एमएच ०४ डीव्हाय ३५६७ या क्रमांकाची कार संशयास्पदरीत्या येताना दिसताच पथकाने तिला अडविले. झडतीदरम्यान कारमधून सुमारे ३ किलो वजनाचे खवले मांजराचे खवले, तीन नखे तसेच सांबराची चार शिंगे जप्त करण्यात आली. कारसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करून प्रथम वर्ग न्यायालय घोडेगाव येथे हजर करण्यात आले. ही कारवाई पुणे विभागाचे वनसंरक्षक आशिष ठाकर व उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्रीय उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी केली.

## सुनेत्रा पवारांना राष्ट्रीय अध्यक्षा करण्यासाठी सहाजणांचा विरोध

### ' त्या' आमदारांचा शोध घ्या,: रोहित पवार

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा काकी या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व्हाव्यात, यासाठी पक्षातील बहुतांश आमदारांनी पाठिंबा दिला होता, काही सहाजणांनी या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी सह्या केल्या नाहीत. ते पदाधिकारी आणि आमदार कोण?, असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण आणि अन्य बाबींवर भाष्य केले. यावेळी त्यांनी एक महत्वाचा दावा केला. सुनेत्रा पवार यांना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष करावे, यासाठी मोजक्या लोकांनी समर्थन दिले नसल्याकडे रोहित पवार यांनी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही आमदारांशी बोलल्यावर तुम्हाला कळेल, सुनेत्रा काकी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व्हाव्यात यासाठी सगळ्याच आमदारांनी सह्या केल्यात असे नाही. ३५ आमदारांनी या प्रस्तावावर सह्या केल्या होत्या, असे आम्हाला कळते. त्या ३५ आमदारांपैकी एखाद्याला जाऊन विचारा, ते सगळ्या गोष्टी तुम्हाला स्पष्ट सांगतील. याशिवाय, राष्ट्रवादी काँग्रेसच्या बहुतांश पदाधिकाऱ्यांनी सुनेत्रा काकींसाठीच सह्या केल्या आहेत. ज्यांनी सह्या केल्यात त्यांना तुम्ही विचारा. ज्यांनी सुनेत्रा वहिनींना राष्ट्रीय अध्यक्ष करण्याच्या प्रस्तावावर सह्या केल्या नाहीत, त्यांनी का केल्या नाहीत आणि ते आमदार किंवा पदाधिकारी कोण आहेत, हा संशोधनाचा विषय



असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले. येत्या २६ फेब्रुवारीला सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा म्हणून निवड होईल, अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी अलीकडेच दिली होती. मात्र, त्यापूर्वी प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे आरोप झाले होते.

## दोघा वृद्ध नागरिकांची सव्वातीन कोटींची फसवणूक

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : तुमच्या आधार कार्डचा वापर करुन बनावट बँक खाते काढून त्याद्वारे मनी लॉड्रिंग झाले असल्याचे सांगून दोघा वृद्ध गृहस्थांना अटकेची भिती दाखवून त्यांना सव्वा तीन कोटी रुपये वेगवेगळ्या बँक खात्यात भरण्यास सांगून फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

याबाबत एरंडवणे येथील ७० वर्षाच्या वृद्ध गृहस्थाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार १३ जानेवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान घडला. त्यांना



राहुल रॉय पसर्नल डेटा प्रोटेक्शन ऑफ इंडिया अंधेरी वेस्ट येथून बोलत असल्याचे फोन करणार्याने सांगितले. त्यांचा आधार कार्डाचा वापर करुन मोबाईल अश्लिल व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर पाठवले जात आहे, अशी तक्रार दाखल आहे असे त्यांना सांगितले. पॉप्युलर फ्रंड ऑफ इंडिया या संघटनेच्या संपर्कात असून त्यांच्या मोबाईलनंबर वरुन दीड कोटी रुपयांचा फ्रॉड झाला आहे, असे सांगण्यात आले. ही बाब कोणाला सांगायची नाही, ही सुप्रीम कोर्टाची केस आहे, असे धमकावुन फिर्यादी व त्यांच्या पत्नीला प्रेशरमध्ये ठेवले. त्यांना वारंवार प्रेशर करुन त्यांच्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर एकूण २ कोटी १ लाख ९० हजार २४७ रुपये भरायला भाग पाडून त्यांची फसवणूक केली. सायबर चोरट्यांच्या धमक्यांमुळे दोघे पतीपत्नी इतके घाबरले होते की, पुण्यात असलेली आपली मुलगी व जावयालाही त्यांनी गोष्ट सांगितली नाही. पोलीस निरीक्षक देवकाते अधिक तपास करीत आहेत.

## मलमिश्रित व अपुरा पाणी पुरवठा; पुणेकरांच्या जीवाशी खेळ

जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : पुण्यात सध्या प्रतिव्यक्ती दहा लिटरही पाणी मिळत नसल्याची स्थिती आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्यात मलमिश्रीत सांडपाण्याची मिसळ होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून दूषित पाण्यामुळे नागरिकांना उलटी, जुलाब आणि अतिसाराचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी अशुद्ध व कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यावरून म हापालिका प्रशासनाला चांगलाच जाब विचारला.

परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत महापौर मंजुषा नागपुरे यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्याचे निर्देश दिले. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेला सुरवात झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या (अजित पवार) नगरसेविका प्रिया गदादे यांनी जनता वसाहतमधील ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याबाबत मुद्दा उपस्थित केला. कोंढवा, महंमदवाडीसह समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा अपुरा होत आहे. किमान अर्धा ते एक तास पाणी मिळणे अपेक्षित आहे; परंतु प्रतिव्यक्ती १० लिटर देखील पाणी मिळत नाही. त्यामुळे टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. असे सांगीतले.

काँग्रेसचे प्रशांत जगताप, राष्ट्रवादीचे हाजी गफ ूर पठाण, वैशाली बनकर, सूरज लोखंडे, अश्विनी लांडगे, भाजपचे हरिदास चरवड, प्राची आल्हाट, दिलीप वेडे - पाटील, ॲड. प्रसन्न जगताप यांनीही प्रशासनाला धारेवर धरले.

## 'टिपू सुलतान नव्हे, आता अशफाक उल्ला खान चौक'

### मिरा-भाईंदरच्या महासभेत ठराव मंजूर

जनप्रवास : प्रतिनिधी

भाईंदर : मिरा-भाईंदर महापालिकेची पहिली महासभा गाजली ती टिपू सुलतान चौक हे नाव रद्द करण्याच्या मुद्यावरुन. भाजपाचे संजय पवार यांनी महासभेत हा ठराव मांडला . याला काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेवकांनी स्थापन केलेल्या मिरा भाईंदर विकास आघाडीने हरकत घेतली . मात्र, अखेरच्या घटकेला मिरा भाईंदर विकास आघाडीने युटर्न घेत, टिपू सुलतान चौकच्या नावाऐवजी स्वातंत्र्य लढ्यातील महान नेता खान अब्दुल गफार खान यांचे नाव सुचवले तर भाजपाने थोर स्वातंत्र्यसेनानी अशफाक उल्ला खान यांच नाव सुचवलं. ७७ विरुध्द १३ मतांनी अशफाक उल्ला खान यांचे नाव देण्याचा ठराव बहुमताने मंजूर झाला .

ही महासभा अनेक विषयांनी गाजली . आमदार प्रताप सरनाईक यांनी मांडलेल्या अनेक विकासकामांवर यावेळी आक्षेप घेण्यात आले, तसेच त्या कामांच्या चौकशीची मागणीदेखील करण्यात आली. त्यात कोट्यावधी खर्च करुन बांधण्यात आलेले स्व. बाळासाहेब ठाकरे कलादान, चेना नदीवरील पूल, तेथील रस्ते हे विशेष करुन एका बांधकाम व्यावसायिकाच्या फायद्यासाठी झाल्याचा ठपका ठेवण्यात आला, तसेच महासभेत जेवणाच्या वेळी पालिकेतर्फे ठेवण्यात आलेल्या व्हेज जेवणाच्या मुद्दयावरही काही नगरसेवकांनी आक्षेप घेत, नॉनव्हेज जेवणाची मागणी केली .

मीरा-भाईंदर महापालिकेमध्ये सत्ताधारी



भाजपाने धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी तसेच वातावरण खराब होऊन वाद चिघळण्यासाठी हजरत टिपू सुलतान चौकाचे नाव बदलण्याचा घाट घालण्याचा प्रयत्न महासभेत केल्याचा आरोप काँग्रेसने केला . २०१६ सालच्या महासभेत हजरत टिपू सुलतान चौकाचे नाव भाजपनेच दिले होते. त्यावेळी आमदार नरेंद्र मेहता यांनी ठराव मांडला होता, तसेच या ठरावाला भाजपच्या वर्षा भानुशाली यांनी अनुदान दिल्याचा ठरावच काँग्रेसने सादर केला . त्यामुळे भाजपची चांगलीच अडचण झाली . दरम्यान, भाजपाने टिपू सुलतान चौकाला थोर स्वातंत्र्यसेनानी अशफाकउल्ला खान यांचे नावाचा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला .

# अग्रलेख : संशयकल्लोळ एकदाचा दूर व्हावा...!

उपमुख्यमंत्री व राज्याचे धडाकेबाज नेते अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे संपूर्ण राज्यालाच मोठा धक्का बसला होता. आता हा अपघात असल्याचे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते व अजितदादांचे 'मोठ्ठे काका' खा. शरद पवार यांनी पहिल्याच दिवशी जाहीर केले. त्याबाबत कोणतेही राजकारण होऊ नये, असेही त्यांनी निक्षूण सांगितले. परंतु नाही म्हटले तरी अजितदादांचे समर्थक पक्षातील असोत वा शरद पवार समर्थक, अजितदादांच्या मृत्यूबद्दल घातपाताचा संशय व्यक्त करू लागले आहेत. एवढेच नव्हे तर अजितदादांचे पुतणे आ. रोहित पवार यांनी तर आजोबांच्या आदेशानंतरही अजितदादांचा मृत्यू हा नैसर्गिक नसून विमान अपघातातील अनेक त्रुटी दाखवून देत हा घातपात असल्याचे आरोप करण्यास सुरुवात केली. त्याबाबत त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न त्याला जणू पुष्टीच देण्याचे ठरत आहेत.

वास्तविक दादा राजकीयदृष्ट्या मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत असताना हा अपघात झाल्यामुळे या अपघातावर संशय व्यक्त करण्यात येत आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी दादा आग्रही होते आणि त्यांच्या पुढाकारानेच हे दोन्ही पक्ष लवकरच एकत्र येणार होते. त्यामुळे राज्यातील राजकारण देखील बरेच ढवळले जाणार होते. या पृष्ठभूमीवर हा अपघात झाल्याने त्यांच्या मृत्यूबद्दल संशय निर्माण स्वाभाविक होते. या संशयाला रोहित पवारांनी वाचा फोडली. त्यांनी या अपघाताच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत आणि अजून तरी या प्रश्नांची कोणतीही समाधानकारक स्पष्टीकरणे संबंधित यंत्रणांकडून दिल्या गेलेली नाही. त्यातच या विमानातील 'ब्लॅक बॉक्स' जळाल्याची बातमी समोर आली. कदाचित हा खडा टाकून पाहण्याचा प्रयत्न असावा.

'ब्लॅक बॉक्स' सगळ्या प्रकारची शक्यता लक्षात घेऊन तयार करण्यात येतो. अकराशे अंश तापमानावर एक तास टिकून राहण्याची त्याची क्षमता असते. त्यामुळे त्या अपघातात 'ब्लॅक बॉक्स' नष्ट झाला असण्याची शक्यता नाही. शिवाय 'ब्लॅक बॉक्स'विमानाच्या शेपटाकडील भागात असतो, या अपघातात शेपटाकडील भाग नष्ट झालेला नाही. तात्पर्य 'ब्लॅक बॉक्स' जळाला किंवा त्यातील माहिती नष्ट झाली हा तर्क मान्य होण्यासारखा नाही. शिवाय तज्ज्ञांच्या मते 'ब्लॅकबॉक्स' जळाला तरी त्यातील चिप' ज्यामध्ये सगळी माहिती साठवलेली असतेती सुरक्षित राहते. आता 'ब्लॅकबॉक्स' अधिक तपासणीसाठी अमेरिकेत पाठविण्यात येणार असल्याची बातमी आली आहे. याचा अर्थ 'ब्लॅक बॉक्स' तसा सुरक्षित आहे. त्यामुळे 'ब्लॅक बॉक्स' नष्ट झाल्याची बातमी कुणी मुद्दाम पेरली तर नाही ना, अशी शंका येत आहे.

विमानातील अतिरिक्त इंधन साठ्यावर प्रश्न उपस्थित करीत रोहित पवारांनी विमान त्यातील प्रवाशांसह पूर्णपणे नष्ट होण्यासाठीच तर हे करण्यात आले नव्हते ना, अशी शंका व्यक्त केली आहे. अजितदादांचा पूर्वनियोजित कार्यक्रम अचानक बदलणे, विमानाचा वैमानिक ऐनवेळी बदलणे, अधिक सुरक्षित आणि सोप्या भागाकडून विमान उतरविण्याऐवजी पलीकडच्या दुसऱ्या भागाकडून विमान उतरविण्याचा अट्टाहास, विमानाची उड्डाण क्षमता संपलेली असतानाही ते विमान वापरात असणे आणि अजितदादांना नेमके तेच विमान उपलब्ध करून देणे, यासोबतच मुख्य वैमानिकाची मानसिक स्थिती, त्याच्यासमोर असलेल्या आर्थिक अडचणी आणि अपघातामुळे मिळणारा मोठा विमा लाभ अशा अनेक मुद्यांवर रोहित पवारांनी संबंधित यंत्रणांना स्पष्टीकरण मागितले आहे, ते मिळेल की नाही हे सांगता येणार नाही.

हा घातपात असेल तर हे सगळे प्रश्न दडपून टाकल्या जातील आणि तसे काही नसेल तर चौकशी पारदर्शकपणे होईल आणि या अपघाताच्या संदर्भात उपस्थित होत असलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले जाईल. सुनेत्राताईंनीही आता या अपघाताबद्दल संशय व्यक्त करीत या अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. अर्थात रोहित पवार यांच्या या शंका-कुशंकांबाबत महायुतीच्या नेत्यांकडून बगल देण्याचा उद्योग सुरू आहे. त्यांच्याकडून रोहित पवारांकडे काही पुरावे असतील तर त्यांनी सरकारला किंवा संबंधित यंत्रणांना द्यावेत, चौकशीत अडथळा आणू नये, असा पवित्रा घेतला आहे. एकूणच सीबीआय चौकशीतून सगळ्याच गोष्टींचा उलगडा होईल, अर्थात ती चौकशीदेखील पारदर्शकपणे झाली तरच, हा घातपात असेल तर त्यामागे खूप मोठे षडयंत्र आहे, हे निश्चित आणि केवळ एखाद-दुसऱ्या व्यक्तीचा हात त्यामागे नक्कीच नसेल.

कुण्यातरी एका व्यक्तीच्या सूचनेनुसार असा अपघात घडवून आणता येत नाही. त्यात अनेक व्यक्ती, अनेक घटक सामील असतील आणि या सगळ्याची तयारी खूप आधीपासून सुरु असेल. अर्थात सध्यातरी या संदर्भात केवळ तर्कच व्यक्त केले जात आहेत. या अपघाताच्या पारदर्शक चौकशीतूनच सगळे काही स्पष्ट होणार आहे. सीबीआय चौकशी केवळ अपघातापुरती मर्यादित नसेल, या अपघातामागची सगळी संभाव्य कारणे तपासली जातील. सगळ्या शकांची आणि पुराव्यांची सखोल तपासणी होईल, सगळे तर्क कसोटीवर घासले जातील. त्यामुळेच या अपघाताची सीबीआय चौकशी अधिक महत्त्वाची ठरते, या चौकशीतून सगळे संशय दूर होतील किंवा हा घातपात असेल तर त्यामागचे सुत्रधार उघडे पडतील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. अर्थात वर म्हटल्याप्रमाणे ही सगळी चौकशी पारदर्शीपणे, कोणत्याही दबावाला बळी न पडता झाली तरच.

# शरद पवार भाजपसोबत जाण्याची भीती



राजकारण


## राज्यसभेवर पाठविण्यास काँग्रेमधून विरोधाचा सूर

राष्ट्रवादी पक्ष विलिनीकरण आणि त्यातून शरद पवार भाजपसोबत जाण्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांकडून राज्यसभेसाठी राष्ट्रवादीचे नेते शरद पवारांच्या नावाला विरोध होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यसभेसाठी राज्यातील सात जागांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने बुधवारी जाहीर केला असून, या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांकडून पवारांच्या नावाला विरोधाचा झेंडा दाखविण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होईल. राज्यसभा निवडणूक जाहीर झाल्याने राजकीय पक्षांमध्ये मतांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर जवळपास निकालात निघालेल्या महाविकास आघाडीच्या ऐक्याची या निवडणुकीत कसोटी लागणार आहे. त्यात महाविकास आघाडीच्या वाट्याला राज्यसभेची एकच जागा येत असल्याने ती राष्ट्रवादी (शप) पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दिली जाणार की, अन्य कोणाला याची





जोरदार चर्चा रंगली आहे.

महाविकास आघाडीची एकजूट महत्त्वाची ठरणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, फौजिया खान, भाजपचे डॉ. भागवत कराड, धैर्यशील पाटील, रिपब्लिकन पक्षाचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, काँग्रेसच्या रजनी पाटील आणि शिवसेना (उबाठा) पक्षाच्या प्रियांका चतुर्वेदी यांची राज्यसभेची मुदत दोन एप्रिल २०२६ रोजी संपत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राहुरीचे शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे विधानसभेतील दोन जागा रिक्त आहेत. विधानसभेत भाजपचे १३१, शिवसेनेचे ५७, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४०, शिवसेना (उबाठा) पक्षाचे २०, काँग्रेसचे १६, राष्ट्रवादी-शपचे १० तसेच अपक्ष आणि इतर मिळून १२ असे संख्याबळ आहे. राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी पहिल्या पसंतीच्या ३७ मतांची गरज आहे. त्यामुळे भाजपचे चार, शिवसेना आणि राष्ट्रवादीचा प्रत्येकी एक तसेच महाविकास आघाडीचा एक उमेदवार निवडून जाऊ शकतो.

### शरद पवारांचा नकार, की...?

शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांना महाविकास आघाडीच्या संख्याबळातून राज्यसभेवर पाठविण्याचे संकेत दिले होते. पण, राष्ट्रवादी (शप)मधून अद्याप याविषयी अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शरद पवार सध्या ८५ वर्षांचे आहेत. त्यांनी यापूर्वीच राज्यसभेची निवडणूक लढवणार नसल्याचे म्हटले होते. वाढलेले वय आणि प्रकृती लक्षात घेता पवार राज्यसभेवर जातील का, हा प्रश्न आहे. पवारांनी राज्यसभेवर जाण्यास नकार दिला, तर आघाडीला सहमतीचा उमेदवार द्यावा लागेल.

**काँग्रेसच्या सल्लागार समितीत विरोध**

महाराष्ट्र काँग्रेसच्या बुधवारी मुंबईत पार पडलेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत या निवडणुकीबाबत प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या नावाला पसंती दिल्यास काँग्रेसकडून त्याला विरोध होऊ शकतो, अशी माहिती पक्षातील काही ज्येष्ठ नेत्याने 'महाराष्ट्र टाइम्स'ला दिली. गेल्या काही दिवसांपासून राजकीय परिस्थिती लक्षात घेता राष्ट्रवादीची भाजपसोबत वाढलेली जवळीक आणि त्याबाबतच्या चर्चा लक्षात घेता शरद पवारांना संधी देऊ नये, अशी मागणी काँग्रेसच्या एका गटातून केली जात आहे.

महाविकास आघाडीकडून नव्या चेहऱ्याला संधी द्यावी, असे मत अनेकांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस शप भाजपसोबत जाऊ शकते, अशी दाट शक्यता गेल्या काही दिवसांपासून वर्तवली जात आहे. यासोबतच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे शरद पवारांना ही जागा सोडल्यास महाविकास आघाडीच्या वाट्याला येणारी एक जागाही नंतर महायुतीकडे जाऊ शकते, असे मत व्यक्त केले जात आहे. त्यामुळे काँग्रेसमधील एक गट शरद पवारांच्या नावाला विरोध दर्शवत असला तरी याबाबत अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडूनच घेतला जाणार असल्याचे सांगण्यात येते.



# अंतरंग

## बांगलादेश फर्स्ट, नव्या पर्वाला सुरूवात

भारताच्या सरहद्दीवर असलेल्या बांगलादेशाच्या पदच्युत पंतप्रधान व आवामी लीगच्या प्रमुख शेख हसीना गेल्या दिड वर्षापासून भारतात आश्रयासाठी आहेत आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकीत बांगलादेशातील मतदारांनी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीला (बीएनपी) सत्ता स्थापनेचा स्पष्ट जनादेश दिला आहे. बीएनपीच्या दिवंगत नेत्या खलिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान यांच्या नेतृत्वावर तेथील जनतेने प्रचंड विश्वास प्रकट केला आहे. बांगलादेशात तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली नवे पर्व सुरू झाले असून यापुढे भारत व बांगलादेश यांचे संबंध कसे राहतील याची जगाला मोठी उत्सुकता आहे.

तब्बल वीस वर्षांनी राजधानी ढाकामधे बीएनपी सत्तेवर आली आहे.बांगलादेशात मोहंमद युनूस यांच्या हंगामी सरकारने आवामी लीगवर बंदी घातल्यानंतर व बीएनपीने २९९ पैकी २१२ जागा जिंकून ऐतिहासिक विजय प्राप्त केला.तब्बल सतरा वर्षे तारिक रहमान हे लंडनमधे राहिले. मात्र त्यांची आई खलिदा झिया ढाका येथेच वास्तव्याला होती. खलिदा यांनी अखेरचा श्वासही बांगलादेशातच घेतला. त्यांचा राजकीय वारस म्हणून तारिक रहमान यांना पंतप्रधानपदाची जबाबदारी संभाळायची आहे. बीएनपीच्या दिवंगत अध्यक्षा खलिदा झिया यांच्याशी भारताचे फारसे चांगले संबंध राहिलेले नाहीत, उलट शेख हसीना यांच्या काळात भारताचे मैत्रीसंबंध चांगले होते व व्यापारही मोठा होता, भारताची गुंतवणकही चांगली होती. त्यामुळे आईच्या विचारानेच तारिक रहमान वाटचाल करणार असतील तर भारताला खूप सावध राहावे लागेल. सन २०१४ मधे नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारतात भाजपाप्रणित एनडीएचे पहिले पर्व सुरू झाले तेव्हा तारिक रहमान हे लंडनला होते. भाजपा व बीएनपी हे दोन्ही पक्ष उजव्या विचारसरणीचे आहेत. सरकारविरोधी असंतोषाचा स्फोट झाला. लाखो विद्यार्थी - युवक रस्त्यावर आले. शेख हसीना यांचीही प्रशासनावरील पकड सुटली, लाखोंच्या संख्येने चाल करून येणाऱ्या हिंसक जमवाला रोखणे पोलिस किंवा सुरक्षा दलाला शक्य झाले नाही.

सन २००७ मधे लष्कराचा पाठिंबा घेऊन बांगला देशात स्थापन झालेल्या काळजीवाहू सरकारने तारिक रहमान यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप ठेऊन अटक केली होती. खटला चालू असताना त्यांना अंगात बुलेटप्रुफ जाकीट व डोक्यावर हेल्मेट घालून कोर्टात उभे केले जात असे. त्यांना अठरा महिने तुरूंगात राहावे लागले होते. वैद्यकीय उपचाराच्या निमित्ताने त्यांना लंडनला जावे लागलेव तेथे ते निर्वासित म्हणून सतरा वर्षे राहिले. तारिक रहमान यांनी बांगलादेशातील सत्तासंघर्षात सूड आणि छळाचा अनुभव घेतलाय. हंगामी सरकारचे प्रमुख मोहंमद युनूस यांनी त्यांच्या प्रत्यार्पणाचा मुद्दा अनेकदा उठवला पण भारत सरकारने त्यांना प्रतिसाद दिला नाही.आता तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली लोकांनी निवडून दिलेले सरकार स्थापन झाले आहे. रहमान यांनी शेख हसीना यांना बांगला देशात परत पाठविण्याची मागणी केली तर भारत सरकार काय करेल हे आज सांगता येणार नाही. शेख हसीना यांचा भारतातील राजाश्रय हा दोन देशातील अतिशय संवेदनशील मुद्दा बनला आहे. बीएनपीने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात रोजगार व विकासाच्या मुद्यांवर भर दिला आहे.

माहिती-तंत्रज्ञान व दळवळण क्षेत्रात दहा लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन बीएनपीने दिले आहे.देशात बेरोजगारी प्रचंड असल्याने तरूणांना रोजगार व नोकऱ्या देणे हे नव्या सरकारपुढे मोठे आव्हान आहे.जीडीपीच्या ५ टक्के आरोग्यसेवा व वैद्यकीय उपचारावर खर्च करण्याचा संकल्प बीएनपीने केला आहे. एक लाख कर्मचारी बळ वाढविण्यात येणार आहे.बंद उद्योगधंद्यांचे पुनरूज्जीवन व गरीबांना जीवनावश्यक वस्तुंसाठी फ'मिली कार्ड देण्याची घोषणा बीएनपीने केली आहे. त्याच्या काळात दुसऱ्या कोणाला येऊच दिले नाही. जो पंतप्रधान असेल तो पक्षप्रमुख नसेल अशी तरतूद करण्याचे धाडस तारिक रहमन दाखवू शकतील का ?याकडे सर्व देशाचे लक्ष आहे. देशात आणीबाणी जारी करण्याचा अधिकार केवळ पंतप्रधानपदावरील एका व्यक्तिला असणार नाही तर त्यासाठी मंत्रिमंडळ व विरोधी पक्षनेत्याची लेखी संमती घेण्याची घटना दुरूस्ती नवे पंतप्रधान करू शकतील का ? बीएनपीला प्रचंड मतदान होण्यामागे निवडणूक जाहीरनम्यातील आश्वासने हेसुध्दा मोठे कारण आहे.

तारिक रहमान हाचबीएनपीचा आणि बांगलादेशचा जगापुढे नवा चेहरा आहे.पक्षावर बंदी घातल्यामुळे शेख हसीना यांच्या आवामी लिगने निवडणुकच लढवली नव्हती. त्यामुळे निवडणुकीनंतर जमात ए इस्लाम हा या देशात दोन क्रमांकाचा मोठा पक्ष बनला आहे. पंतप्रधानपदाच्या शपथविधी सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी बांगलादेशने भारत, पाकिस्तान, चीन, सौदी अरेबिया, तुर्की, संयुक्त अरब अमिरती, कतार, मलेशिया, ब्रुनेई, श्रीलंका, नेपाळ, मालदिव, भुतान आदी देशांना निमंत्रण दिले होते. गेल्या अकरा वर्षात भारत पाकिस्तान संबंध ताणले गेले आहेत, चीनबरोबर संबंध दबावाखाली किंवा तणावाखाली आहेत. शेख हसीनांना भारतात राजाश्रय दिल्यापासून बांगलादेशशी भारताचे संबंध ताणले गेले आहे. मोहंमद युनूस यांच्या काळात बांगलादेशने चीन व पाकिस्तानशी संबंध वाढवले त्याचा परिणाम भारताशी दुरावा वाढला.बांगलादेशची ९४ टक्के सीमा भारताला लागून आहे.भारतातील इशान्येकडीला राज्याना सुरक्षा व घुसखोरी या समस्यांना अहोरात्र सामोरो जावे लागते.बांगलादेशात सत्तापरिवर्तन झाले असले तरी नव्या पर्वात भारताला सावध भूमिका घ्यावी लागणार आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ फाल्गुन शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायण मास- फाल्गुन
ऋतु - सौर शिशिर
शुक्ल पक्ष तिथि : तृतीया १४:३८:४० नक्षत्र : उत्तराभाद्रपद २०:०७:११ योग : साध्य १८:२२:४७ करण : गर १४:३८:४०
करण : वणिज २५:५१:४७+ सूर्य : कुम्भ चन्द्र : मीन
हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - रमजान तारीख - २ विशेष
अप्पा महाराज पुण्यतिथी - जळगाव

## राशी भविष्य...

**मेष** प्रसन्नतेमुळे आपल्या कामाचे सार्थक होईल. भेटवस्तू मिळण्याची शक्यता आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. वहान चालवितांना काळजी घ्या.

**वृषभ** कौटुंबिक जीवन आनंददायी राहील. पूर्वी केलेल्या कामाचे परिणाम चांगले दिसून येण्यास सुरूवात होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. साहस व पराक्रमात वाढ होईल.

**मिथून** विनयशिल राहून आपले कामे पार पाडा. प्रत्येक कामात यश मिळणार आहे. आकर्षक प्रस्ताव मिळतील फायदा घ्या. जीवनसाथीशी आर्थिक बाबतीत मतभेद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कर्क** गृहपयोगी वस्तू खरेदी कराल. दूरदर्शीपणा ठेवून कार्य करा. व्यापारातील हेतु साध्य होतील. शुभकार्यात सहभागी होण्याचा योग येईल.

**सिंह** आधिकारी वर्ग आपल्या कामाची स्तुती करतील. बौध्दीक पातळीत वाढ होईल. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. हट्ट करू नका, हानीकारक होऊ शकतो.

**कन्या** अडचणींचा सामना करून आपण आपले ध्येय साध्य करू शकता. मन प्रसन्न राहील. व्यापार फायदेशीर राहण्याचा योग आहे. विरोधकांपासून सावध रहा.

**तूळ** पराक्रमामुळे आपल्याला यश मिळेल. स्तुतीपासून दूर रहा. मानसिक संतोष, प्रसन्नतेमुळे कार्यक्षमतेत वाढ होईल. व्यापार व्यवसाय फायदेशीर राहील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**वृश्चिक** रोजगारात परिवर्तन होण्याची शक्यता आहे. जोखमीच्या कामापासून दूर रहा. शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. नोकरीत बढतीचे योग आहेत.

**धनू** दुसऱ्याच्या भरोशावर राहून काम हाती घेऊ नका. कौटुंबिक समस्या निर्माण होतील. देण्या घेण्याच्या व्यवहारात सतत्य बाळगा. व्यापार मध्यम राहील.

**मकर** स्वत:ची योग्यता समजून घेतली तरच आपण समाजात प्रतिष्ठा संपादन करू शकाल. मुलांची प्रगती होईल. व्यापार चांगला चालेल. कायदेशीर प्रकरणी बेफीकरीपणा दाखवू नका.

**कुंभ** साहस पराक्रमात वाढ होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. थंडीचे आजार जाणवतील. योग्य निर्णय घेण्याची मनस्थिती राहील. मित्रांची मदत मिळेल.

**मीन** दिवस चांगला जाणार असला तरी आर्थिक तंगी राहणार आहे. मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल. व्यापार नोकरीत आलेल्या अडचणींचा सामना करावा लागेल. प्रवास करू नका.



# पारावरचा फड

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीनंतर सत्ता स्थापनेचा खेळ अनेक ठिकाणी सुरू असल्याचे दिसून येते. यात चंद्रपूरमध्ये काँग्रेस सर्वाधिक मोठा पक्ष असल्याने महापौरपदासह सत्तेचा दावेदार होता. परंतु तिथे अंतर्गत गटबाजीचा फायदा घेत उबाठाच्या पाठिंब्यावर भाजपने महापौरपदासह सत्ता बळकावली. त्याला मात्र भाजपने विकासाला साथ आणि उद्धव ठाकरेंचा कंट्रोल निसटल्याची टीका करण्यात आली. तसाच प्रकार भिवंडीत सध्या सुरू आहे. तेथे भाजपमध्ये फुटीचा फायदा घेत काँग्रेस मोठा पक्ष असल्याने महापौरपदासह सत्तास्थापनेकडे वाटचाल करीत आहे. त्याला मात्र भाजप नेत्यांकडून जे काँग्रेसबरोबर जातील ते भाजपचे नव्हेत असा पवित्रा घेत आहेत. जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठीही सांगली, साताऱ्यात असाच प्रकार सुरू आहे. राष्ट्रवादी, शिंदे सेनेला व्हिप व सत्तेचा बडगा दाखवत दमबाजी सुरू आहे. एकूणच भाजपचे 'हम करे तो सही साला... दुजा करे तो कॅरॅक्टर ढिला...' यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**बाबूराव :** लोकल इलेक्शानमधी पन म्हायुतीचाच बोलबाला सुरु झाल्याचं दिसतंया.

**बाबूराव :** खराय, पर इरोदकांची बी ताकद वाडल्याचं दिसून येतंया आनेक ठिकानी.

**पांडूनाना :** आरं, पर ह्यात मताच्या ईभागनीचा ख्योळ हुतुया, हे म्हाईकास आगाडीला लक्शात येत न्हाय का?

**बाबूराव :** येतंया, पर सतरा इरोदातलं पक्श आन् त्येंचा आडेलतट्टूपना आडचनीचा हुतुया.

**पांडूनाना :** आक्शी बराबर, त्या म्हंबईत दोनी ठाकरे भाऊ एक झालं खरं. पर कांगरेसचा इरोद नडला आन् संगं वंचित. मतईभागनीनं म्हंबई गेली ठाकऱ्यांकडनं.

**बाबूराव :** त्या कांगरेसचं म्हजी बुडत्याचा पाय खोलात झालंया बग. एकमेव चंदरपुरात म्हापालिका ताब्यात येत हुती. तीथं त्या उबाठा शेनेनं भाजपची संगत केली आन् हिसका दाकिवला.

**पांडूनाना :** भाजप संदीसाधू हाय, जोडीला केंदर, राज्याची सत्ता हायच न्हवं. त्यामुळं पळत्यात समदी.

**बाबूराव :** त्या सांगलीत बी तसंच झालं. दोनी राष्टरवादी एकीचं चाललंया. लडली बी संगं. पर ती गेली म्हायुतीत आन् सत्ता गेली म्हाईकास आगाडीची.


**पांडूनाना :** तसाच परकार आता सांगली, सातारा झेडपीत बी सुरु हाय. राष्टरवादी संगं लडली आन् आता म्हायुतीचा घटक म्हनून भाजपवालं हाक्क सांगत्याती.

**बाबूराव :** त्येंचं म्हजी कसं बी जमवा, आमची सत्ता.

**पांडूनाना :** पर हे कांगरेस, राष्टरवादीवालं कशापाई तानत्याती. त्या आजितदादा गटाला आद्यक्श द्याचं ना.

**बाबूराव :** आरं कांगरेस आन् शरद पवारांची राष्टरवादी ह्येंच्या नेत्यात तर एकमत हाय व्हय. जिरवाजिरवीच.

**पांडूनाना :** मग काय, वेळ घालवला की भाजपचा खेळ अन् ठणठण गोपाल! **- अमृत चौगुले**



# जन की बात...

## सकारात्मक विचार करून परीक्षा द्या!



दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १८ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळे-वर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वत:ही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल.

**- श्याम ठाणेदार, दौंड**



# उपदेश कथा

**अहंभाव**

एके दिवशी भोजराजा आपल्या निवडक मित्रांना घेऊन क्रीडोद्यानाकडे निघाला. वाटेतही अर्थातच काव्यासंबंधीच्या चर्चा चाललेल्या होत्या. एवढ्यात रस्त्यात एक तपस्वी त्यांना सामोरा आला. भक्तीभावाने राजाने हात जोडले व तो म्हणाला, महाराज आपल्यासार'या तपस्वीजनाचं दर्शन केवळ भाग्यवंतांनाच होतं. पण आपलं निवासस्थान कोणतं? भोजनाची आपण काय व्यवस्था करता? राजाच्या या प्रश्नावर तपस्व्याने स्मित केले व म्हणाला, राजा, वन हेच माझं निवासस्थान, तिथं वृक्षांची सुमधुर फळं विनासायास मिळतात. जागोजागी नद्यांचं शीतल व मधुर पाणी असतं. सुंदर लतापल्लवांनी बनलेली सुकोमल शय्या असते. कोणत्याच गोष्टीची कोणाकडेच याचना करावी लागत नाही. राजा तपस्व्याचे ते अमृततुल्य बोल ऐकतच राहिला. तेव्हा राजा, आम्ही कोणाचीच कशासाठीही याचना करीत नाही आणि कोणाकडूनच काहीही घेत नाही. त्या तपस्व्याने शांतपणे सांगितले. ते ऐकून राजाने तर त्या तपस्व्याच्या चरणांवर लोटांगण घातले.

Truhome FINANCE

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| १. श्री. किशनपाल मलखी सिंग (कर्जदार) २. सौ.मिनू किशनपालसिंह माहूर (सह-कर्जदार सर्व निवासी ठिकाण - एसआर क्रमांक ३४ हिस्सा क्रमांक १/२शिवा हाइट्स फ्लॅट क्रमांक ७ पहिला धनकवडी पुणे धनकवडी पुणे महाराष्ट्र भारत ४१०४३ तसेच येथे: एटी पोस्ट शेमाली, जि. भुलिंसिर उत्तर प्रदेश -२०३००१. तसेच येथे- फ्लॅट क्रमांक ०७पहिला मजला शिवाची उंचीक्रमांक ३४ हिस्सा क्रमांक १/२धनकवडी पुणे धनकवडी पुणे महाराष्ट्र४१११०४३ कर्जाची रक्कम -रु.८,००,०००/- कर्ज खाते क्रमांक.- SHLHPUNH0000024 एनपीए तारीख - ०५/०९/२०२५ | फ्लॅट क्रमांक ७, ६०० चौरस फूट क्षेत्रफळ (बांधलेले क्षेत्रफळ) (गुंटेवारी प्रमाणपत्रानुसार ५५.८१ चौरस मीटर बांधलेले क्षेत्रफळ) यांचा समावेश आहे. पहिल्या मजल्यावर, "शिव उंची" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, जी जमीन बेअरिंग सर्वेक्षण क्रमांक ३४ हिस्सा क्रमांक १/२ बेअरिंगवर बांधली गेली आहे. ही इमारत त्याच्या महानगरपालिका क्रमांक पी/डी/३२/०००१४००० वर बांधली गेली आहे. ही इमारत धनकवडी, ताल, हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित आहे. ही इमारत पुणे महानगरपालिका आणि उपनिबंधक ताल हवेली, जिल्हा पुणे यांच्या अधिकारक्षेत्रात आहे. पूर्व: फ्लॅट क्रमांक ६ पश्चिम: श्री. भोसले यांची मालमत्ता दक्षिण: श्री. बाजीराव चव्हाण यांची मालमत्ता उत्तर: जिना/फ्लेट क्रमांक ४ | मागणी सूचना तारीख: १०-०२-२०२६ दिनांक ०७-०२-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SHLHPUNH0000024 अंतर्गत रु.८,६३,१२१.००/- (रुपये आठ लाख त्रेसष्ट हजार एकशे एकवीस फक्त) आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, खर्च इ. |
| १. श्री. विनोद हिंदुराव जाधव (कर्जदार) २. श्री. अश्विनी विनोद जाधव (सह-कर्जदार) सर्व निवासी येथे दुकान प्रथम निवड क्रमांक १६५ गुरुद्वारा कॉलनी बालाजी एंटरप्रायझेस लोहोगाव हवेली महाराष्ट्र भारत ४११०४७ .तसेच येथे- दुकान क्रमांक ३३/२, प्लॉट क्रमांक ५, खोली क्रमांक ३, लेन क्रमांक १४, केकम बंगला समोर विद्यानगर, धारवाडे जवळ गोड गोड घर पुणे - ४११०३२ तसेच येथे: मालमत्तेचा पत्ता: पहिला मजला इमारत क्रमांक एम २० राजनीगंध सीएचएस सीटीएस क्रमांक २१७५ फ्लॅट क्रमांक २०७० सर्वेक्षण क्रमांक १९१ ए विमानतळ रोड महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ सर्वेक्षण क्रमांक १९१ ए विमानतळ रोड महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ पुणे हवेली महाराष्ट्र ४११०१४ कर्जाची रक्कम -रु.१९,४८,९७६/- रु. कर्ज खाते क्रमांक.- SHLHPUEN0000170 एनपीए तारीख - ०५/०२/२०२६ | मालमत्तेचा संपूर्ण तुकडा आणि भाग, "राजनीगंध सहकारी गृहनिर्माण सोसायटी लिमिटेड" मधील, महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या पहिल्या मजल्यावरील ३७५ चौरस फूट म्हणजेच ३४.८३ चौरस मीटर जागेचे व्यवस्थापन करणारे फ्लॅट क्रमांक २०७०, जे सीटीएस क्रमांक २१७५ शी संबंधित आहे, ते मौजे येरवडा, ताल हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित आहे, जे पुणे महानगरपालिका आणि उप-निबंधक ताल हवेली, जिल्हा पुणे यांच्या अधिकारक्षेत्रात आहे. पूर्व: फ्लॅट क्रमांक २०६९ पश्चिम: सोसायटीची खुली जागा दक्षिण: फ्लॅट क्रमांक २०७१ उत्तर: सोसायटीची खुली जागा | मागणी सूचना तारीख: १०-०२-२०२६ दिनांक ०९-०२-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SHLHPUEN0000170 अंतर्गत रु.२१,३२,६१५.००/- (रुपये एकवीस लाख बत्तीस हजार सहाशे पंधरा फक्त) आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - पुणे
दिनांक - २०-०२-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

# तरुणीच्या अपहरणाने भिगवण पेटले

■ जनप्रवास प्रतिनिधी

**भिगवण :** इंदापूर तालुका व दौंड तालुक्याच्या सीमेवरील स्वामी- चिंचोली गावातील घडलेले या धक्कादायक प्रकाराचे दिवसभर भिगवण मध्ये पडसाद उमटले आज दिवसभर भिगवन मध्ये कडकडीत बंद ठेवण्यात आला भिगवण परिसरातून एका २१ वर्षीय तरुणीचे भरदिवसा अपहरण झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी घडली. या घटनेचे संपूर्ण तालुक्यात तीव्र पडसाद उमटले असून, बुधवारी भिगवण शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. संतप्त ग्रामस्थांनी मध्यरात्री पुणे-सोलापूर महामार्गावर टायरची जाळपोळ करत रस्ता रोखून धरल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, या प्रकरणी 'सकल हिंदू समाजा'च्या वतीने भव्य 'हिंदू जनआक्रोश निषेध मोर्चा' काढण्यात आला.







मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी ०३.३० च्या सुमारास संबंधित तरुणी ही आपल्या आई आणि भावासोबत भिगवण बाजारपेठेत खरेदीसाठी आली होती. यावेळी आरोपींनी त्यांना अडवून तरुणीचा भाऊ आणि आईच्या डोळ्यात तिखटाची पूड फेकली. आईला मारहाण करून आरोपींनी तरुणीला बळजबरीने पळवून नेले.

याप्रकरणी भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून,१ जहीर हरून शेख आणि २आयान हरून शेख राहणार ( स्वामी-चिंचोली शेख वस्ती,तालुका ,दौंड .जिल्हा. पुणे )या दोन सख्ख्या भावांची नावे संशयित आरोपी म्हणून समोर आली आहेत युवती व संबंधित आरोपी हे शेजारीच. राहत असल्याचे समोर आले आहे तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे युवती व संबंधित आरोपी हे मागील काही दिवसापासून मोबाईलच्या माध्यमातून कॉल व मेसेज याद्वारे संपर्कात असल्याचे समोर आले आहे,

अचानक घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे अनेक नागरिकांनी भिगवन पोलीस स्टेशन कडे धाव घेतली व गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. आज दिवसभर पोलीस स्टेशन व परिसरामध्ये शेकडो जमाव जमून विविध प्रकारच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे होते


अपहृत मुलीचा शोध लागेपर्यंत पोलीस ठाण्यातून हलणार नाही, असा पवित्रा मुलीच्या कुटुंबीयांनी व त्यांच्या नातेवाईकांनी घेतला होता. या मोर्चात आमदार संग्राम जगताप आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी सहभाग घेतला. जनआक्रोश मोर्चाला संबोधित करताना दोन्ही नेत्यांनी मुलीचा लवकरात लवकर शोध घ्यावा आणि आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून मोबाईल लोकेशनसह तांत्रिक तपास सुरू केला आहे. संशयितांच्या शोधासाठी सहा विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत अशी माहिती पुणे ग्रामीण एस. पी संदीप सिंह गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित युवाची ए४ लाँगबुक्स आणि मराठी 'सुविचार' पेन्सिली महाराष्ट्रभरातील दुकानात उपलब्ध

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्रभरात साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर स्टेशनरी ब्रँड 'युवा'तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित शालेय साहित्याची विशेष मालिका सादर करण्यात आली आहे. सतराव्या शतकातील मराठा राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्मृतीत अत्यंत महत्त्वाचे असून, या उत्पादनांच्या माध्यमातून परिचित ऐतिहासिक संदर्भ थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता येतात. शाळांमधील विविध वयोगटांच्या गरजा लक्षात घेऊन ही श्रेणी साकारण्यात आली आहे. मोठ्या आकाराची ए४ लाँगबुक्स माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतात, तर पेन्सिली सर्वच वयोगटांतील विद्यार्थ्यांच्या



वापरासाठी अनुकूल आहेत.या सर्व ए४ लाँगबुक्सवर छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित प्रसंग आणि प्रतीकांचे चित्रात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. तसेच या पेन्सिलींवर छोटे मराठी सुविचारही देण्यात आले आहेत, ज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुणांचे वर्णन करणारे सुविचारही समाविष्ट आहेत.

# आंबेगाव तालुका पत्रकार संघाचा वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्काराने होणार गौरव

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कारांची घोषणा झाली असून त्या मध्ये पुणे विभागातून आंबेगाव तालुका पत्रकार संघाची निवड झाली आहे.सदर पुरस्कार वितरण कार्यक्रम रविवार दि. २२ रोजी कर्जत येथील रॉयल गार्डनमध्ये सकाळी ११ वाजता हा सोहळा होत असल्याची माहिती तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील आणि उपाध्यक्ष निलेश कान्नव यांनी दिली.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण आणि राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे होत आहे. पत्रकार संघ विविध उपक्रम राबवत असल्याने त्यांच्या कार्याचा राज्य पातळीवर सन्मान व्हावा, त्यांचं कौतूक व्हावं यासाठी प्रत्येक महसूल विभागातून एका तालुका पत्रकार संघाची आदर्श पत्रकार संघ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

त्यानुसार आंबेगाव तालुका पत्रकार संघाची निवड झाली आहे.या निवडीमध्ये आंबेगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी ग्रामीण पत्रकारासाठी कार्यशाळा आयोजित केली जाते.तसेच आरोग्य शिबीर,विविध समाज प्रबोधन कार्यक्रम राबवले जात असल्याचे सांगण्यात आले.पुरस्कार वितरण सोहळयास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक,विश्वस्त शरद पाबळे, जिल्हा अध्यक्ष सुनील लोणकर यानी केले.

# खवले मांजर व सांबर शिंगांच्या तस्करीप्रकरणी दोघांना अटक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** वन्यप्राणी खवले मांजर यांच्या खवल्यांची तसेच सांबरांच्या शिंगांची तस्करी करणाऱ्या टोळीवर जुन्नर वनविभागाने मोठी कारवाई करत दोन जणांना अटक केली आहे. या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, मंचर यांना १६ फेब्रुवारी २०२६ रोजी खवले मांजर व सांबर यांच्या अवयवांची तस्करी होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वनविभागाच्या पथकाने सापळा रचून मंचर येथील मोरडे फुड्स कंपनीजवळील झडका खानावळीच्या मागील परिसरात पहारा ठेवला. दरम्यान, मारुती सुझुकी कंपनीची निळ्या रंगाची 'स्विफ्ट डिझायर' (क्र. एमएच ०४ डीव्हाय ३५६७) ही कार संशयितरित्या येताना दिसताच पथकाने तिला अडवले. झडतीदरम्यान कारमधून सुमारे ३ किलो वजनाचे खवले मांजराचे खवले, खवले मांजराचे ३ नखे तसेच सांबराची ४ शिंगे जप्त करण्यात आली. संबंधित वाहनासह मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.




या प्रकरणी उदय शंकर सुर्वे (रा. शिस्ते, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) व नवीन करीम खान (रा. वडवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड) या दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधात वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कलम १, ३९, ४८ व ५१ अन्वये वनपरिमंडळ मंचर येथे गुन्हा रजिस्टर क्र. ०९/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपींना १६ फेब्रुवारी रोजी अटक करून १७ फेब्रुवारी रोजी प्रथम वर्ग न्यायालय, घोडेगाव येथे हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे.

वनविभागाच्या माहितीनुसार, खवले मांजर व सांबर हे दोन्ही वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असून त्यांच्या शिकार, विक्री, खरेदी, अवैध वाहतूक किंवा व्यापार करणे हा गंभीर व अजामिनपात्र गुन्हा आहे. अशा गुन्ह्यांसाठी सात वर्षांपर्यंत कारावास व २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

या कारवाईत वनसंरक्षक वनवृत्त पुणे आशीष ठाकर व उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्रीय उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी मंचर विकास भोसले तसेच वनरक्षक रईस मोमीन, विवेक जगताप, शिवाजी ढोले, सौ. पूजा पवार, सौ. धकुली शिवशरण आणि वनपरिक्षेत्र मंचरचे इतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

# सावरकर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ ओतूर संचलित वीर सावरकर विद्यालय बल्लाळवाडी पांगरी माथा या विद्यालयात बुधवारी दि.१८ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान फारूक आतार यांनी भूषविले कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी मध्ये विष्णू डोंगरे,आदर्श गाव बल्लाळवाडी माजी उपसरपंच सुधीर महाराज घोलप,सेवानिवृत्त पोस्टमास्टर महादू शिंदे, जिजाभाऊ डोंगरे, रवी शिंदे, कमलेश शिंदे ,दत्तात्रय घोलप, विलास तांबे शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या अध्यापिका शमा अन्सारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष झावरे सर्व सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी



पालक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार केला यानंतर इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयास भेटवस्तू प्रदान केली तसेच विद्यार्थ्यांना परतफेड म्हणून शैक्षणिक पॅड वाटप करण्यात आले इयत्ता पाचवी ते नववीच्या ओंकार पारधी,राहुल पारधी ,संग्राम घोलप आदी विद्यार्थ्यांना एसएससी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

दहावीच्या विद्यार्थ्यांनी साक्षी भालेकर ,शालू भालेराव,साहिल शिंदे ,अभय केदार, सचिन लोखंडे ,या विद्यार्थ्यांनी त्यांना आलेले सर्व अनुभव व्यक्त केले तसेच शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखू असे आश्वासन दिले.प्रमुख अतिथी मनोगत महादू शिंदे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक येणाऱ्या पाचशे द्वितीय क्रमांक तीनशे रूपये तृतीय क्रमांक दोनशे रूपये अशी पारितोषिके जाहीर केली. विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुधीर महाराज घोलप यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या अध्यक्ष मनोगतात आतार सर यांनी रामायण,महाभारत,यातील काही कथांडरे विद्यार्थ्यांना संस्काराचे धडे देऊन, छत्रपती शिवाजी महाराज शंभुराजे यांचाही इतिहास वर्णन केला व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षण शास्त्र महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी शिवबाचा पाळणा गाऊन दाखवला तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. परीक्षेच्या काळात आहार आरोग्य संभाळा असा सल्ला दिला. या अध्यापिकांनी विविध उपक्रम विद्यालयात सादर केले तसेच यावेळी वृक्षारोपण अतिथींच्या हस्ते करण्यात आले व्यसनमुक्तीची शपथ घेण्यात आली. मुख्याध्यापक संतोष झावरे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.सूत्रसंचालन महेश थोरात यांनी केले. परवीन सुलताना इनामदार यांनी आभार मानले

मुख्याध्यापक संतोष झावरे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.सूत्रसंचालन महेश थोरात यांनी केले. परवीन सुलताना इनामदार यांनी आभार मानले

# संस्कार पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून शिवरायांचा जयघोष

## विद्यार्थ्यांनी साकारली छत्रपतींसह जिजाऊंची वेशभूषा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील संस्कार पब्लिक स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली असून यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपतींसह, मावळे व जिजाऊंची वेशभूषा साकारून कला सादरीकरण केल्याने येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी झाली आहे.




शिक्रापूर ता. शिरुर येथील संस्कार पब्लिक स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, दरम्यान शिक्षिका सोनाली मॅडम , सुप्रिया मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत छत्रपतींच्या शौर्य, दूरदृष्टी, स्वराज्याची संकल्पना व लोककल्याणकारी राज्यकारभार यावर प्रेरणादायी संदेश दिला. सदर या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, बाल शंभुराजे यांची आणि अन्य विद्यार्थ्यांनी मावळ्यांची वेशभूषा परिधान करत जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले, दरम्यान विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक वेशभूषा साकारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यात शिवजयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** जुन्नर शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक वेशभूषा आणि ढोल-ताशांच्या गजरात अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली असून यानिमित्त ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, पालखी सोहळे आणि भव्य मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यासह देशात शिवजयंती उत्साहात साजरी केली जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शिवनेरी गडावर आले होते.

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंतीनिमित्त राज्यभरात मोठा उत्साह लोकांमध्ये बघायला मिळतोय. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रात्रीपासूनच शिवनेरी गडावर भाविकांची मोठी गर्दी बघायला मिळत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे शिवनेरी गडावर पोहोचले. रात्री गडावर शिवभक्तांची जास्त गर्दी झाल्यामुळे थोडीशी चेंगराचेंगरी झाली चेंगराचेंगरी होऊन, दोन-तीन शिवभक्त किरकोळ जखमी झाल्याची घटना गडावरील हत्ती दरवाजाजवळ घडली.



शिवनेरी गडावर शासकीय कार्यक्रम थाटामाटात साजरा करण्यात आला.ढोल ताशाच्या गजर शिवनेरी किल्ल्यावर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा जोजावत जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

किल्ले शिवनेरीवर ३९६ वी शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा केला जात आहे. शिवाई देवी मंदिरात शिवाई देवी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा शासकीय अभिषेक जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते संपन्न झाला.शिवजयंतीनिमित्त शिवभक्तांचा मोठा उत्साह गडावर बघायला मिळतोय. फक्त शिवनेरी किल्लाच नाही तर राज्यातील विविध ठिकाणी मिरवणुकीचेही आयोजन करण्यात आले होते.

शिवजयंती निमित्त आळेफाटा येथे दाई वेल्फेअर सोसायटी च्या वतीने स्व.नानी यांच्या स्मरणार्थ तृतीयपंथी समाजाच्या वतीने हजारो शिवभक्तांना मोफत पाणी वाटप केले.

ओतूर येथील जिल्हा परिषद शाळा नंबर एक (मुलांची), जिल्हा परिषद शाळा नंबर दोन (मुलींची), चैतन्य विद्यालय, गाडगे महाराज विद्यालय ओतूर, सरस्वती विद्यालय उदापूर, पुष्पवती विद्यालय डिंगोरे येथे छत्रपती शिवरायांच्या अर्धाकृती मूर्तीचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील शिक्षकांच्या हस्ते छत्रपती शिवरायांची आरती करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारीत पोवाडे सादर केले, तर विद्यार्थिनींनी छत्रपती शिवरायांच्या जन्माचा पाळणा सादर केला.

यांच्यासह ओतूर, उदापूर, डिंगोरे, मांदारणे, धोलवड ठिकेकरवाडी, हिवरेखुर्द, हिवरेबुद्रुक, ओझर, उंब्रज, डुंबरवाडी, रोहोकडी, आंबेगव्हाण, पाचघर, नेतवड, माळवाडी, पांगरी, बल्लाळवाडी, गायमुखवाडी, पिंपरीपेंढार, आळेफाटा, राजुरी, बेल्हे, आणे आदी गावांमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली.

## संक्षीप्त वृत्त

### एण्ड टीव्हीवर मिळणार मनोरंजनाचा दुप्पट आनंद!

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** एण्ड टीव्हीवर या आठवड्यात प्रेक्षकांना मनोरंजनाचा दुहेरी आनंद मिळणार आहे. 'घरवाली पेडवाली', 'भाबीजी घर पर है २.०' आणि 'हप्पू की उलटन पलटन' या मालिकांमध्ये हाय-वोल्टेज ड्रामा, धक्कादायक उलगडे आणि पोट धरून हसवणारे प्रसंग पाहायला मिळणार आहेत. 'घरवाली पेडवाली'मध्ये पप्पी महिलेच्या वेशात घरातून पळ काढतो, तर लट्टू त्याला जादूने पोपट बनवतो. एटीएममधील चोरी, खात्यातून एक लाख रुपये काढल्याचा मेसेज आणि त्यानंतर उडालेला गोंधळ यामुळे कथानकाला वेग येतो. सर्वात मोठा धक्का तेव्हा बसतो, जेव्हा बोलणारा पोपट संपूर्ण कुटुंबासमोर जीतूच्या दोन पत्नी असल्याचे सत्य उघड करतो.

### स्व.ससाणे यांना स्मृतीदिनानिमित्ताने अभिवादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे नूकताच माजी आ.स्व.जयंतराव ससाणे यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्व.ससाणे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सेवा संस्थेचे अध्यक्ष मंजाबापू थोरात, बा.स.संचालक मयुर पटारे, माजी उपसरपंच भारत भवार, संत सावताचे संचालक विलास दाभाडे, माजी सरपंच भाऊसाहेब मगर, महेंद्र संत, रोहीदास बोडखे, एकनाथ पटारे, सुभाष ब्राम्हणे, गोटीराम दाभाडे, बाबासाहेब तनपुरे, मोहन रणनवरे, काका रणनवरे, किशोर बनकर, संदीप बनकर, इंद्रभान दाभाडे, अनिल माने आदी उपस्थित होते.

### टपरी लावण्याच्या कारणावरून वाद, मार्केट यार्डात दोन गटात तुफान राडा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर प्रतिनिधी नगर मध्ये मार्केट यार्ड महात्मा फुले चौक, परिसरात दोन गटात जोरदार वाद होऊन सार्वजनिक शांततेचा भंग झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी सहा जणांसह इतर १० ते १५ अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी कुणाल दगडू हारबा, भारती अशोक बारसे, अमोल रघुनाथ हारबा, सार्थक अशोक बारसे (सर्व रा. सारसनगर) यांना ताब्यात घेतले आहे. तसेच प्रकाश बाबुराव भागानगरे, शिवतेज प्रकाश भागानगरे आणि इतर ८ ते १० अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. टपरी लावण्याच्या कारणावरून हा वाद झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून कोतवाली पोलीस पुढील तपास करत आहेत.

### 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात शिवजयंतीचा जल्लोष

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सनई-चौघड्यांचे मंजुळ स्वर, तुतारीच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका आणि मर्दानी खेळांसह 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!', 'जय भवानी, जय शिवराय!' आणि 'नमो पार्वती पते, हर हर महादेव' या घोषणांच्या जयघोषात एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ येथे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे प्रतीक असलेला भगवा ध्वज फडकावून जयंती उत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### लक्झरी विभागात फोक्सवॅगनची दमदार झेप; 'टायरॉन आर-लाइन' ४६.९९ लाखांत बाजारात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जर्मन वाहन निर्माता फोक्सवॅगन ची भारतीय शाखा फोक्सवॅगन इंडियाने प्रीमियम क्रीडोपयोगी वाहन विभागात आपली उपस्थिती अधिक मजबूत करत 'टायरॉन आर-लाइन' या वैविध्यपूर्ण लक्झरी क्रीडोपयोगी वाहनाची घोषणा केली आहे. ४६ लाख ९९ हजार रुपये (कारखाना किंमत) या आकर्षक प्रारंभिक दरात हे वाहन भारतीय बाजारात सादर करण्यात आले आहे. महत्त्वाकांक्षी आणि सूक्ष्मदर्शी ग्राहकांच्या जीवनशैलीचा विचार करून तयार करण्यात आलेल्या टायरॉन आर-लाइनमध्ये प्रगत रचना, गतिमान कार्यक्षमता, अत्याधुनिक तंत्रसुविधा आणि अपवादात्मक आराम यांचा संगम पाहायला मिळतो. दैनंदिन वापरातील उपयुक्तता जपत उच्च दर्जाचा अनुभव देण्यावर कंपनीने विशेष भर दिला आहे.

### एमआयटी डब्ल्यूपीयूत छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याण केंद्रीत सुशासन, न्यायनिष्ठ प्रशासन आणि स्वराज्याची अढळ निष्ठा याचा केवळ उपदेश केला नाही, तर आपल्या कृतीतून त्यांचा आदर्श समाजासमोर ठेवला, म्हणून पावणेचारशे वर्षांनंतर ही त्यांच्या विचारांची ज्वाला विझलेली नाही. उलट ती आजच्या पिढीच्या रक्तात आत्मसन्मान, संघर्षशीलता आणि राष्ट्र निष्ठेचे स्फुरण निर्माण करत आहेत. काळ बदलला तरीही शिवाजी महाराजांचा गौरवशाली वैचारिक वारसा आजही तितकाच जिवंत तेजस्वी आणि जाज्वल्य आहे. अशी भावना एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये शिकणार्या परराज्यातील विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# शिवजयंती तसेच आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ऑपरेशन ऑलआऊट अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालय अंतर्गत कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** ■ शिवजयंती तसेच आगामी सण,उत्सवाच्या पार्श्वभूमीवर अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी श्रीरामपूर विभागातील अधिनस्त १७ पोलीस स्टेशन हद्दीत दि.१७ फेब्रूवारी रोजी ऑपरेशन ऑलआऊटचे आयोजन केले होते.

या ऑपरेशन ऑलआऊट मध्ये श्रीरामपूर विभागात ६१२ समन्सची बजावणी करण्यात आली असून हजर न राहीलेल्या आरोपी/साक्षीदार यांचेविरूध्द मा.न्यायालयाने बेलेबल वॉरंट काढले असून पैकी २१२ आरोपी/ साक्षीदार यांना वॉरंटची बजावणी करण्यात आली आहे. समन्स व वॉरंट बजावूनही काही आरोपी व साक्षीदार हजर न राहील्याने त्यांचेविरूध्द मा.न्यायालयाने पकड वॉरंट काढले आहे. १०० आरोपीपैकी ३१ आरोपी यांना अटक करण्यात आली असून ६९ आरोपी हे न्यायालयासमोर हजर झाले आहे. दारूबंदी व जुगार कायद्याअंतर्गत ४२ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ८०,५००/ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच जुगार कायद्यान्वये १८ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १,५४,४४०/ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आर्म अॅक्ट कारवाई अंतर्गत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन हद्दीत असणार्या हुसेननगर भागातून १ व मिल्लतनगर भागातून





१ अशा दोन विनापरवाना लोखंडी तलवार मिळून आल्या असून आरोपी १ व २ यांचेवर अनूक्रमे गु.र.नं.१२२/२०२६ आर्म अॅक्ट ४/२५ तसेच गु.र.नं. ११५/२०२६ आर्म अॅक्ट ४/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच कोपरगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीतूनही दोन आरोपीकडून प्रत्येकी एक विनापरवाना लोखंडी तलवार ताब्यात घेण्यात आली असून त्यांचेविरूध्द कोपरगांव पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एन डी पी सी कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत संगमनेर पोलीस स्टेशन हद्दीत केलेल्या कारवाईत दोन आरोपींकडे अवैधरीत्या २४,९२५/ रूपये किमतीचा गांजा आढळून आला आहे. सदर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाहीजे असलेले तसेच फरार ९ आरोपींना पकडण्यात आले असून १९ हिस्ट्रीशीटर व १६ हद्दपार आरोपी यांना तपासून त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात आले आहे. मोटार वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईत एकूण ६७ केसेस दाखल करण्यात आल्या असून ४९,०००/ दंड वसूल करण्यात आला आहे. नेवासा व शेवगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन आरोपीवर दोन वेगवेगळ्या गुन्ह्यासंदर्भात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीत हद्दपार असणार्या आरोपीने हद्दपारीचे उल्लंघन केल्यामुळे त्याचेवर गुन्हा नोंद करण्यात आला असून संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई ही जिल्हा पोलीस अधिकक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे, यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपूर जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी संगमनेर कुणाल सोणवणे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी अमोल भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव निरज राजगुरू यांनी केली आहे.

## त्रिमूर्ती विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** त्रिमूर्ती माध्यमिक विद्यालय, घोगरगाव येथे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचा परिसर भगव्या पताकांनी व आकर्षक फलकांनी सजविण्यात आला होता. सकाळी सर्वप्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन महाराजांची आरती केली. आरतीच्या मंगल ध्वनींनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आणि जय भवानी, जय




शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य संतोष जावळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र चोभे व जयश्री चोभे, सोमनाथ शिंदे , प्रशांत बहिरट ,गणेश वाळके अशोक घोरपडे(शिंगवे केशव पालक) उपस्थित होते. यावेळी डीके एच पी यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र सांगितले. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. काही विद्यार्थ्यांनी स्वराज्य स्थापनेचा इतिहास व महाराजांचे शौर्य यावर प्रभावी भाषणे केली. त्यांच्या भाषणातून महाराजांची दूरदृष्टी, पराक्रम, शिस्तप्रियता व जनतेप्रती असलेली कळकळ यांचे सुंदर वर्णन करण्यात आले. तसेच देशभक्तीपर गीते सादर करून विद्यार्थ्यांनी वातावरण भारावून टाकले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य जावळे यांनी विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून न्याय, समता व स्वाभिमान यांचे महत्त्व जगाला दाखवून दिले. त्यांच्या कार्याङङङक्षतून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन देशसेवेसाठी सज्ज व्हावे, असे त्यांनी नमूद केले.

## छत्रपती शिवाजी महाराज हे शौर्याचे प्रतीक : महापौर गाडे



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात आपले शौर्य, लष्करी डावपेच आणि कौशल्य दाखवले असले तरी, त्यांचे जीवन आजही आपल्याला आपले राष्ट्र मजबूत करण्यासाठी प्रेरणा देते. छत्रपती शिवाजी महाराज हे शौर्याचे प्रतीक आहेत, असे प्रतिपादन अहिल्यानगरचे नवनिर्वाचित महापौर ज्योती गाडे यांनी केले. स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी उद्योजक अमोल गाडे, स्नेहबंधचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे, माजी प्राचार्य एकनाथ जगताप, स्वीय सहाय्यक शेखर देशपांडे, सचिन पेंडुरकर, बालाजी वल्लाल, गणेश डेलमाडे, स्वयंम बास्कर आदी उपस्थित होते.

## राहुरी पोलीस ठाण्यासमोर शिवजयंती साजरी; पोलीस प्रशासनाचा तीव्र निषेध

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीच्या विटंबना घटनेला वर्ष पूर्ण होत आले तरी अद्याप आरोपींना अटक न झाल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर 'मराठा बहुउद्देशीय संस्था संचलित शिवजयंती उत्सव समिती'च्या वतीने यंदाची शिवजयंती राहुरी पोलीस ठाण्यासमोर साजरी करण्यात आली.

यावेळी पोलीस प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा निषेध करत शिवभक्तांनी आक्रमक भूमिका घेतली.२६ मार्च २०२५ रोजी राहुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची विटंबना करण्यात आली होती. या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले होते. त्यावेळी तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. पोलीस प्रशासनाने आरोपींना लवकर अटक करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, वर्ष उलटूनही तपासात ठोस प्रगती न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी प्रशासनावर तीव्र टीका केली. घटनेनंतर आपण उपोषण केले होते, मात्र आश्वासनानंतर ते मागे घेतले गेले, असे सांगत त्यांनी आता सर्व समाज एकत्र येऊन न्यायासाठी रस्त्यावर उतरल्याचे स्पष्ट केले.



आरोपींना तत्काळ अटक न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा एकीकरणचे मच्छिंद्र गुंड यांनी पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना उद्देशून जबाबदारीने कारवाई करण्याची मागणी केली. शेतकरी सेनेचे रवींद्र मोरे यांनी पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्यास आरोपी नक्की सापडतील, असा विश्वास व्यक्त केला. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पारख, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र वाडेकर व अपर्णा धमाळ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या आंदोलनादरम्यान शिवशंभू प्रेमींच्या वतीने प्रशासनाला स्पष्ट इशारा देण्यात आला. २६ मार्च २०२६ रोजी घटनेला एक वर्ष पूर्ण होत असून, त्या तारखेपर्यंत आरोपींवर कायदेशीर कारवाई न झाल्यास राहुरी पोलीस स्टेशनसमोर शासनाचे 'वर्षश्राद्ध' घालून आंदोलन करण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात 'जिजाऊंच्या लेकी' समूहाच्या वतीने मूर्तीचे विधिवत पूजन करून झाली. त्यानंतर बालकलाकारांनी पोवाडे व शिवजयंती गीतांवर नृत्य सादर केले. तहसीलदार डॉ. अमित पवार व पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना महिलांच्या प्रतिनिधींच्या हस्ते निवेदन देण्यात आले. यावेळी राजूभाऊ शेटे, बाळासाहेब उंडे, विराज धसाळ, नंदुशेठ भट्टड, अनिल कासार, किरण कडू, साहेबराव म्हसे, विलास तरवडे, नितीन कल्हापुरे, ज्ञानेश्वर गाडे, कांतीलाल जगधने यांच्यासह अनेक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवेंद्र लांबे, विक्रम मोढे, आदेश जाधव, अविनाश क्षीरसागर, प्रितेश तनपुरे, राजेंद्र खोजे, दादासाहेब खाडे, सतिश घुले आदींनी परिश्रम घेतले.

दरम्यान, राहुरी तालुका शांतताप्रिय असून अशा घटनांमुळे तालुक्याची बदनामी होत आहे. आरोपी कोणत्याही जाती-धर्माचे असोत, त्यांना अटक व्हावी, हीच आमची मागणी आहे, असे देवेंद्र लांबे यांनी सांगितले.

## भक्तीच्या उत्सवात गुंडांचा उच्छाद! लिंपणगाव यात्रेत लोखंडी हत्यारांनी हल्ला; प्रशासनाला उघड आव्हान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** महाशिवरात्री निमित्त लिपंणगाव ता . श्रीगोंदा भरलेल्या यात्रेत मंगळवारी सायंकाळी उघड दहशत माजवणारी मारहाणीची गंभीर घटना घडली. आखाडा सुरू असतानाच दारूच्या नशेत बेभान झालेल्या तीन तरुणांनी एका युवकावर लोखंडी साहित्य व बेल्टच्या पट्ट्याने हल्ला चढवून बेदम मारहाण केली.

यात्रेतील गर्दीत घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ भीतीचे सावट पसरले. संबंधितांवर कठोर कारवाईचे संकेत पोलिसांकडून मिळत आहेत.

दरवर्षी पंचक्रोशीसह दूरवरून भाविकांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात पार पडणाऱ्या या यात्रेत यंदाही महाभिषेक, कीर्तन, शेरनी वाटप, पालखी सोहळा आणि जंगी आखाडा असे कार्यक्रम नियोजनबद्ध झाले. मात्र गर्दीचा गैरफायदा घेत मद्यधुंद तरुणांनी प्रेक्षकांवर हल्ले करून धार्मिक उत्सवाच्या पावित्र्यावर काळा डाग उमटवला.


यात्रेनिमित्त पोलीस बंदोबस्त तैनात असतानाही हल्लेखोरांनी गर्दीच्या ठिकाणी धुमाकूळ घालत दहशत निर्माण केली. जखमी युवकाची भेट घेऊन पोलिसांनी माहिती संकलित केली असून किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. गावातील मध्यस्थीचे प्रयत्न सुरू असले तरी हल्लेखोरांनी माफी न मागितल्यास गुन्हा दाखल करून कडक कारवाई होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे. या घटनेनंतर लिंपणगाव परिसरात तणावपूर्ण शांतता पसरली आहे.

## ओतूर येथील गाढवेपटात बिबट्याची मादी जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर जवळील गाढवेपट येथे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी, वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यामध्ये, गुरूवारी पहाटेच्या सुमारास बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी दिली.

याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे माहिती देताना म्हणाले की,ओतूर येथील गाढवेपट परिसरात बिबट्याचा वावर असल्यामुळे येथील नागरिकांनी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावावा,अशी मागणी



वनविभागाकडे केली होती. दरम्यान या ठिकाणी लावलेल्या पिंजऱ्यामध्ये गुरूवारी दि.१९ रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास अंदाजे एक ते दिड वर्षे वयाची बिबट्याची मादी जेरबंद झाल्याची माहिती वनविभागाला मिळाली सदर माहिती मिळताच तात्काळ ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे ओतूर यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी वनपाल सारिका बुट्टे,वनरक्षक किशन खरोडे,किसन केदार यांनी तात्काळ पोहोचून पाहणी करून सदर बिबट्याच्या मादीला ताब्यात घेतले.सदर बिबट्याच्या मादीस माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे दाखल करण्यात आले आहे.ओतूर आणि परिसरात बिबट व अन्य वन्य प्राण्यासंबंधित कुठलीही समस्या असल्यास,नागरिकांनी वनविभागाशी संपर्क साधावा असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुणतांबा येथे शिवजयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास वार्ताहार

**पुणतांबा :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती गावात विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला. झेंडे व पताकांनी रस्ते भगवेमय झाले होते.

येथे उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा सध्या चांगदेव कारखान्याच्या गोडाऊन मध्ये असून तेथे आज शिवजयंतीच्या निमित्ताने महापूजा तसेच महाआ रती करून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला शिवस्मारक समितीने तसेच विविध मंडळ व संघटनांच्या वतीने मुख्य वेशीवर जयंतीनिमित्त उभारलेल्या शिवरायांच्या पुतळ्याची पुष्पहार अर्पण करून पूजा

आरती व अभिवादन करण्यात आले. महाराजांच्या कार्याचा तरुणांनी आदर्श ठेवून वाटचाल केली तर प्रगती निश्चित आहे, असे वक्त्यांनी सांगितले.

यावेळी शिवस्मारक



समितीचे अध्यक्ष दत्ता धनवटे, डॉ धनंजय धनवटे, सुहास वहाडणे , धनंजय जाधव, ग्रा.पं. सदस्य भूषण वाघ, रामचंद्र पवार, श्याम धनवटे, अनिल नळे, बाळासाहेब भोरकडे राजेंद्र थोरात, छगन जोगदंड, भाऊसाहेब जेजुरकर, विजय धनवटे, सुभाष कुलकर्णी, भोला उदावंत, , गौतम थोरात, शशिकांत कांबळे, राहुल धनवटे, सुधाकर जाधव, अमोल सराळकर, प्रताप वहाडणे, आदी उपस्थित होते. स्टेशन रस्त्यावर शिवाजी चौकात छत्रपतींच्या पुतळ्याचे महंत विजयानंद गिरी महाराज यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भास्कर मोटकर , सदाशिव वहाटुळे , उपस्थित होते. सायंकाळी ग्रामपंचायत समोरील पटांगणात शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. विविध परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा समितीने सत्कार केला. चांगदेव नगर येथे विविध कार्यक्रमाने शिवजयंती साजरी करण्यात आली

# शिर्डीत साकारतोय स्वराज्याचा प्रेरणास्थळ; १० कोटींची भव्य शिवसृष्टी लवकरच उभारणार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या विचारांना शिर्डीत भव्य रूप देण्यासाठी १० कोटी रुपयांच्या 'शिवसृष्टी' प्रकल्पाला मंजुरी मिळाली असून वर्क ऑर्डर प्राप्त झाली आहे. त्यामुळे लवकरच या ऐतिहासिक प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

छत्रपती शासन आणि युवा शिर्डी ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित शिवजयंतीनिमित्त कार्यक्रमात बोलताना त्यांनी शिर्डीमध्ये शिवसृष्टी उभारण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक–नगरसेविका, विविध पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने उपस्थित माता–भगिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, सालाबादप्रमाणे शिर्डी परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. युवा शिर्डी ग्रामस्थ आणि छत्रपती शासन या दोन्ही संघटनांच्या माध्यमातून




युवकांना सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांद्वारे योग्य दिशा देण्याचे काम सुरू असून शिर्डीचे भविष्य हे युवकांच्या खांद्यावर असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून युवकांमध्ये संघटनात्मक व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य या संघटनांकडून सातत्याने होत असल्याबद्दल त्यांनी अभिनंदन व आभार व्यक्त केले.

डॉ विखे म्हणाले युवा शिर्डी ग्रामस्थ आणि छत्रपती शासन या दोन्ही संघटनांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय असून युवकांना योग्य दिशा देण्याचे काम विविध सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. नुकत्याच पार पडलेल्या भव्य क्रिकेट स्पर्धेसह विविध उपक्रमांमधून शिर्डीतील युवकांमध्ये संघटनात्मक व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य या दोन्ही संघटनांच्या माध्यमातून प्रभावीपणे होत आहे.

तसेच छत्रपती शासन यांच्या वतीने 'साईंची भूमी – स्वच्छतेची हमी' हा उपक्रम राबविण्यात येत असून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे साईनगरी स्वच्छ व सुंदर ठेवणे ही प्रत्येक शिर्डीकराची जबाबदारी आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, कचरा टाकणे अथवा घाण करणाऱ्या व्यक्तींचे छायाचित्र काढून छत्रपती शासन यांना सादर केल्यास ५०० रुपयांचे बक्षीस देण्याचा उपक्रम हाती घेतल्याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी छत्रपती शासन यांचे आभार व्यक्त केले.

## शिरूरला रक्तदान शिबिराचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाणीचे जादूगार प.पू. गुरुदेव श्री रमणीक मुनीजी म.सा.यांच्या ४७ व्या दीक्षा दिनानिमित्त आणि शिरूर भूषण दानशूर व्यक्तिमत्त्व भामाशाह रसिकलालजी धारीवाल यांच्या जयंतीनिमित्त व कापड बाजार गणेश मित्र मंडळ यांच्या ९९ वर्षांनिमित्त कापड बाजार गणेश मित्र मंडळाच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात १३१ जणांनी रक्तदान केले.

कापड बाजार मित्र मंडळाच्यावतीने घेण्यात आलेले रक्तदान शिबीर व राबवण्यात येत असलेले सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचे यावेळी नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे म्हणाल्या.

शिबीरास शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक नितीन पाचर्णे,नगरसेवक सागर नरवडे, नगरसेवक निलेश पवार, हिमानीश्री महाराज साहब, संघपती भरत चोरडिया, सुनील धाडीवाल, उद्योजक संदीप बिहाणी, धिरज संघवी, मयूर ओस्तवाल, श्रेयांस धाडीवाल आदींनी भेट दिली.

शिरूर नगरपरिषद मंगल कार्यालयासमोर जैन पंचायत भवन येथे या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबीरात सहभागी प्रत्येक रक्तदात्यास इस्त्री व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.शिरुर येथील ओम रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले.कापड बाजार मित्र मंडळाचे प्रितेश कोठारी व पंकज कोठारी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## शिरूरला मंगळवार दि.२४ पासून श्री शिव महापुराण कथा आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** शिरूर, ता.शिरुर, जि.पुणे येथे दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ ते २ मार्च दरम्यान भव्य ''श्री शिव महापुराण कथा'' आयोजन करण्यात आले असून, या धार्मिक पर्वात शिवभक्तांनी सहभागी होऊन शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन उद्योगपती प्रकाशभाऊ धारीवाल व युवा उद्योजक आदित्य धारीवाल यांनी आयोजित पत्रकार परिषदेवेळी केले.

यावेळी आयोजक प्रसिद्ध उद्योगपती व पी.आर फाऊंडेशनचे प्रकाशभाऊ धारीवाल,युवा उद्योजक आदित्य धारीवाल,माजी नगरसेवक विजय दुगड,नगराध्यक्ष ऐश्वर्या पाचर्णे,उपनगराध्यक्ष मितेश गादिया,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहुल पाचर्णे,जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे,माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक रविंद्र ढोबळे,माजी सरपंच अरुण घावटे,विठ्ठल घावटे यांसह आजी माजी नगरसेवक व मान्यवर उपस्थीत होते. श्री शिव महापुराण कथा कार्यक्रम उद्योगपती स्वरसिकलाल धारीवाल नगरी रामलिंग रोड,शिरुर जिल्हा पुणे येथे मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ ते सोमवार दिनांक २ मार्च २६ या कालावधीत दुपारी एक ते सायंकाळी चार या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.या पवित्र कथावाचनाचा शुभयोग आंतरराष्ट्रीय कथा वाचक प.पू.पंडित प्रदीपजी मिश्रा (सिहोर वासी) यांच्या अमृतवाणीतून लाभणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन पी.आर.धारिवाल फाउंडेशन उद्योगपती प्रकाशभाऊ धारिवाल व युवा उद्योजक आदित्य धारिवाल व धारीवाल परीवार यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## श्रीरामपुरात 'भारतीय कर्मचारी संघ' व 'स्वाभिमानी संघा'तर्फे शिवजयंती उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीरामपूर :** भारतीय कर्मचारी संघ व भारतीय स्वाभिमानी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती श्रीरामपूर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी श्रीरामपूर नगरपरिषदेच्या प्रांगणातील शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण भारतीय कर्मचारी संघाचे प्रदेशाध्यक्ष रमेश मकासरे यांचे मार्गदर्शन ठरले. आपल्या भाषणात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला. ''महाराजांचे विचार केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, ते आजच्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांचे व्यवस्थापन कौशल्य आणि रयतेप्रती असलेली निष्ठा आजच्या



कामगार आणि कर्मचाऱ्यांनी अंगीकारणे काळाची गरज आहे,'' असे प्रतिपादन मकासरे यांनी यावेळी केले.

याप्रसंगी भारतीय कर्मचारी संघाचे बापू वैराळ, संदीप पाळंदे, तसेच भारतीय स्वाभिमानी संघाचे सुधाकर बागुल, फ्रान्सीस शेळके यांसह दोन्ही संघटनांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान शिवरायांच्या घोषणांनी नगरपरिषद परिसर दणाणून गेला होता. उपस्थितांनी महाराजांच्या प्रतिमेला नतमस्तक होऊन त्यांच्या कार्यास वंदन केले. या सोहळ्यामुळे शहरात शिवजयंतीचा मोठा उत्साह पाहायला मिळाला.

## मिरजगाव येथे २५.४३ लाखांचा गांजा जप्त; दोघे जेरबंद स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगरची धडक कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** मिरजगाव (ता. कर्जत) येथे अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी मोठी कारवाई करत तब्बल २५ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन आरोपींना अटक केली आहे.



मा. श्री. सोमनाथ घार्गे (पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर) यांच्या आदेशानुसार अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सचे नोडल अधिकारी पो. नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

**गुप्त माहितीवरून सापळा**

मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एमएच १४ जीएच २३३० क्रमांकाची स्कॉर्पिओ गाडीने दोन इसम कर्जतहून पाथर्डीकडे गांजा विक्रीसाठी येणार आहेत. त्यानुसार पथकाने मिरजगाव–कर्जत रोडवरील महात्मा फुले चौकाजवळ सापळा रचला. संशयित स्कॉर्पिओ वाहन अडवून तपासणी केली असता गाडीच्या डिक्कीत चार गोण्या आढळून आल्या. चौकशीअंती त्यामध्ये गांजा असल्याचे निष्पन्न झाले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे (कर्जत विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर व मिरजगाव पोलीस स्टेशनच्या पथकाने संयुक्तरीत्या केली. अंमली पदार्थांविरोधातील मोहिम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## खुनप्रकरणी मोठी कारवाई! कोकणगांव हत्याकांडातील २ आरोपी जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज मोहीम

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील कोकणगांव येथे वादातून घडलेल्या खुनाच्या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी निर्णायक कारवाई करत दोन आरोपींना जेरबंद केले. १६ जानेवारी २०२६ रोजी रात्री झालेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेले भाऊसाहेब नामदेव राजपुत यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पोलिसांनी वेगाने तपासाची सूत्रे हलवून आरोपींपर्यंत पोहोचत कारवाई केली.



दुपारी झालेल्या किरकोळ वादाच्या रागातून आरोपींनी फिर्यादीच्या घरासमोर जमाव करून शिवीगाळ व मारहाण सुरू केली. शुभम यास वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या भाऊसाहेब राजपुत यांच्यावर धारदार हत्याराने छातीत वार करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना पुणे येथे उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी फिर्यादी दया भाऊसाहेब राजपुत (रा. कोकणगांव) यांच्या तक्रारीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३५/२०२६ नोंदवून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली तपासासाठी रवाना झाले. गुप्त माहितीच्या आधारे जामखेड रोड, हत्तीबारव येथे सापळा रचून महेश किरास चव्हाण (वय २५, रा. आढळगाव) व शैला महेश चव्हाण (वय २७, रा. आढळगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मुख्य आरोपी महेश चव्हाण याच्यावर यापूर्वीही चोरी, दरोडा व इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. अटक आरोपींना श्रीगोंदा पोलीस ठाण्यात पुढील तपासासाठी हजर करण्यात आले असून तपास सुरू आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

## छत्रपती शिवरायांच्या विचारांचा आदर्श युवकांनी घ्यावा : निखिल नगरकर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**कर्जत :** ''सतराव्या शतकात पाच सुलतानी सत्ता अंदाधुंद कारभार करत होत्या. या साम्राज्याविरुद्ध शिवरायांनी लढा दिला. कर्नाटकातील बेलवडी येथे सावित्रीबाई देसाई यांनी शिवराय जिवंत असताना कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा पुतळा उभारला होता. छत्रपती शिवरायांकडून शिस्त, शस्त्र, शास्त्र, संघटन, दूरदृष्टी, आर्थिक नियोजन, धर्मनिरपेक्षता, प्रशासननिर्मिती आदि गोष्टी शिकायला हव्या. शिवरायांच्या विचारांचा आदर्श आजच्या युवकांनी घ्यायला हवा. त्यांच्या समानतेचा आदर्श आज समाजाने घ्यावा. संस्कारांचे विद्यापीठ म्हणजे जिजाऊ होत्या. सतराव्या शतकातील युरोपमधील आघाडीचे वृत्तपत्र ''लंडन गॅझेट'' याने छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख 'शिवाजी, द किंग ऑफ इंडिया' असा केला होता'' असे मत, महाराष्ट्राचा महावक्ता विजेता, निखिल सुभाष नगरकर यांनी व्यक्त केले

रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने शिवजयंतीनिमित्त आयोजित केलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज: आजच्या युवकांपुढील आदर्श' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत



होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाम इंडिया रिनेबल एनर्जी, बडोदाचे राजेंद्र राजे शिर्के उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर, सरपंच वैभव भगत तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्ग उपस्थित होता.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. संजय नगरकर म्हणाले की, बोध घेण्यासाठी, मानुस म्हणून जगण्यासाठी महान व्यक्तिमत्त्वांची चरित्रे वाचावयास हवी. शिवचरित्रावरील पहिला पोवाडा महात्मा फुले यांनी लिहिला, शिवजयंती सुरू केली. शिवरायांची सर्वसमावेशक रणनीती प्रेरणादायी होती. नैतिक वर्तनाची शिस्त त्यांनी स्वराज्याला लावली असल्याचे वक्तव्य नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. प्रमोद परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सुखदेव कोल्हे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. राम काळे व प्रा. स्वप्नील म्हस्के यांनी केले.

## कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखाना कार्यस्थळावर शिवजयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, प्रजाहितदक्ष राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी माजी आमदार अशोकराव काळे यांनी सांगितले की, शिवरायांचा कारभार हा लोककल्याणकारी होता



त्यामुळे रयतेचं राज्य हि संकल्पना खरी त्यांच्या काळात पहावयास मिळाली. त्यांच्या राज्यात जनतेमध्ये निर्भयता होती आणि जाती धर्माचा कुठलाही भेदभाव नव्हता.त्यांनी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवून शौर्य, न्याय, कर्तव्यदक्षता आणि लोककल्याण यांचे आदर्श घालून दिले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करतांना शौर्याबरोबरच सुशासनाचा आदर्श निर्माण केला. त्यांनी रयतेच्या हिताला प्राधान्य देत न्याय, पारदर्शकता आणि संघटनशक्ती यांचे महत्त्व अधोरेखित केले.

आजच्या काळातही महाराजांचे विचार आणि त्यांचे व्यवस्थापन कौशल्य आजही विविध क्षेत्रांना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कार्यपद्धतीतून आपल्याला व्यवस्थापन, नेतृत्व, प्रामाणिकपणा, शिस्त आणि राष्ट्रभक्तीची शिकवण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरणारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे,आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बी.बी. सय्यद, असि. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांनी जात धर्म न पहाता न्यायाचे राज्य केले : नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी

### नगरपरिषदच्या वतीने खर्डा चौकात शिवजयंती साजरी; सर्वपक्षीय सर्व समाजबांधवांनी लावली उपस्थिती



■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे, पराक्रम, धैर्य, न्याय आणि स्वाभिमानाचे सर्वोच्च प्रतीक छत्रपती शिवाजी महाराजांनी अन्याय, अत्याचार आणि परकीय सत्तेविरुद्ध लढा देत स्वराज्याची स्थापना केली.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानले. जात धर्म न पहाता आठरपगड समाजातील मावळ्यांना घेऊन न्यायाचे स्वराज्य स्थापन केले.

सर्व धर्मांना समान न्याय, स्त्रियांचा सन्मान, शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे रक्षण हाच स्वराज्य स्थापनेचा विचार होता अशा माझ्या रयतेच्या राजाला मानाचा मुजरा असे प्रतिपादन नगराध्यक्षा प्रांजल अमित चिंतामणी यांनी केले. जामखेड शहरातील खर्डा चौकात नगरपरिषदेच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी बोलत होत्या. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे सर्वच मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी सर्वपक्षीय नगरसेवक सर्व पक्षीय राजकीय पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ़्या संख्येने उपस्थित होते.

# तुमच्या मुलाने खोटे बोलणे सुरु केले आहे का?

टीनएजर्स अर्थात किशोरावस्था. याच अवस्थेत मुलं स्वप्नांचे पंख लावून उडू लागतात पण खाली पडण्याची भीतीसुद्धा मनात असते. या वेळेस पालकांची जबाबदारी असते ती मुलांच्या समस्यां समजून त्या सोडविणे. त्यासाठी काही गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**चोरी/अपराध**

तुमच्या मुलाने खोटं बोलणे सुरू केले आहे का? त्याने नवीन मित्र बनवून जुन्या मित्रांची साथ सोडली आहे का? शाळेतील स्पर्धांत

भाग घेणे बंद केले आहे काय किंवा भाग न घेण्याची कारणे शोधतो काय? बोलण्यात काही नवीन व नको ते शब्द येतात काय? शिव्या देतो काय? त्याच्याकडे अचानक जास्त पैसे दिसू लागले आहेत का? किंवा त्याच्याकडे महागड्या वस्तूंचा संग्रह वाढला आहे का?

**उपाय :** ह्या सर्व गोष्टी तुमच्या मुलामध्ये दिसू लागल्या असतील तर समजा की तुमचे मूल चुकीच्या संगतीत आहे. नवीन वा जुन्या मित्रांचे वर्तन पाहून तो चोरी कराला शिकला आहे. त्यांच्याकडून त्याने त्यांचे अनेक दुर्गुण उचलले आहेत. त्यावर मता करण्यासाठी तुम्ही त्याच्या मित्रांवर लक्ष ठेवायला पाहिजे. मित्रांना घरी बोलवण्यासाठी त्याला सुचवले पाहिजे. ते घरी आल्यावर त्यांच्यासाठी वेळ दिला पाहिजे. त्यामुळे त्याच्या चांगल्या मित्रांमध्ये तुमच्या मुलासाठी जबाबदारी वाढेल. खराब मित्र साथ सोडून देतील किंवा ते स्वत:सुद्धा सुधारण्याचा प्रयत्न करतील. मुलांना जास्त वेळ रिकामे राहू देऊ नका. त्यांच्या रिकाम्या वेळात त्यांना काही तरी कला शिकण्याचा क्लास लावून त्यांचे मन त्यात रमवा.



**नैराश्य**

नैराश्य सर्वांनाच थोडं फार असू शकतं, पण हे केव्हा जास्त वाढू लागते त्याकडे लक्ष ठेवणे पालकांची जबाबदारी आहे. 'टीनएजर्स' ना अभ्यास व परीक्षा, आपले भविष्य, प्रेमसंबंध यामुळे नैराश्य येऊ शकते. मुली मासिक पाळीमुळे तणावात राहतात. तुमचे मूलसुद्धा डिप्रेशनचे शिकार असल्यास त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तुमचे मूल त्याच्या खोलीतच जास्त वेळ रहातो काय किंवा आपल्या छंदांकडे दुर्लक्ष करतो आहे काय? नेहेमी डोकेदुखी किंवा अंगदुखीची तक्रार करतो काय?

**उपाय :** ही लक्षणे बऱ्याच काळापर्यंत राहत असतील तर त्याची कारणे जाणून घेणे फारच आवश्यक आहे, भावनांना समजून घेणे जरूरी आहे आणि आत्महत्या किंवा पळून जाण्यासारख्या गोष्टीसंदर्भातही त्यांच्याशी चर्चा करावी. त्यांना रागावू नये, त्यांच्याशी प्रेमाने बोलावे. तुमच्याकडून त्याच्या समस्या सोडवल्या जाऊ शकत नसतील, तर मानसोपचार तज्ज्ञाकडे किंवा कौन्सिलरकडे न्यावे.

**स्मोकिंग/ दारू पिणे**

टीनएजर्स या सवयींच्या आहारी गेले तर ते या गोष्टी लपवण्याचा भरपूर प्रयत्न करतात. म्हणून तुम्हालाच त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवायला पाहिजे. तुमचे मूल च्युईंगम खातो काय? तो हेवी फरफ्यूम, डियो किंवा आफ्टरशेव लोशन लावायला लागला आहे काय? त्याचा जास्त वेळ मित्रांकडे जातो काय?

**उपाय :** मुलांना या सर्व वाईट सवयींचे दुष्परिणाम सांगायला पाहिजे. त्याचे असं वागणे त्याच्या मित्रांच्या दबावाचाही भाग असू शकतो. त्याला वास्तवाची जाणीव करून द्यायला हवी. नियमन कसे करावे हे त्याला समजून सांगायला हवे.

**ड्रग्स घेणे**

तुमचे मूल घरातील कामे किंवा इतर कामात सहभागी होत नाही काय? तो आपल्या लुक आणि कपड्यांच्या बाबतीत निष्काळजी झाला आहे? त्याची खोली पहिल्यापेक्षा खराब झाली आहे? तो त्याचे फोन कॉल्स लपवायला लागला आहे? त्याचे मित्र बदललेले आहे? तो घरच्या लोकांशी दूर दूर राहायला लागला आहे? त्याची पैशाची मागणी वाढू लागली आहे का?

**उपाय :** त्याच्या खोलीची तपासणी केली पाहिजे. बहुधा तुम्हाला काही असं सापडेल ज्याचा संबंध त्याच्या परिस्थितीशी असेल. त्याच्या डोळ्यांकडे लक्ष दिले पाहिजे. ड्रग घेणाऱ्या मुलांचे डोळे लाल किंवा पिवळे असतात. त्याला ड्रग्सचे दुष्परिणाम सांगायला पाहिजेत. आवश्यक असल्यास त्याला 'ड्रग रिहेबिलेशन सेंटर'मध्ये एडमिट करावे. त्यासाठी घराची इज्जत किंवा लोकं काय म्हणतील या गोष्टींकडे लक्ष देऊ नये.

लहान वयात सेक्स

तुमचे मूल आपल्या बॉयफ्रेंड/गर्लफ्रेंड बरोबर जास्त वेळ घालवत आहे? तो एकदम आत्मविश्वासपूर्ण किंवा प्रौढासारखा वागू लागला आहे? त्याच्या/तिच्या खोलीत तुमचे जाणे त्यांना आवडत नसेल? तुमच्या मुलीला ब्लेडर इंफेक्शन तर झालं नाही ना? कारण पहिल्यांदा सेक्स केल्यानंतर असं होणे शक्य आहे.

**उपाय :** वर दिलेले लक्षण सेक्श्युअली एक्टिव टीनएजर असू शकतात. त्यांच्याशी या विषयावर प्रेमाने बोलावे त्यांना भाषण देणे टाळावे. त्यांना सांगावे की प्रत्येकाला आपले वैयक्तिक आयुष्य जगण्याचा अधिकार आहे.

परंतु भारतीय संस्कृतीत सेक्स ही लग्नानंतरच करण्याची बाब आहे हे पटवून द्यावे. कमी वयात सेक्स केल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते उदा. - गर्भधारणा होणे, लैंगिक संबंधांतून पसरणारे रोग, लग्नानंतर गर्भधारणेत येणाऱ्या अडचणी याविषयी त्याला माहिती द्यावी आणि सावधही करावे.

# सौंदर्यप्रसाधनाचा अतिवापर टाळा

मुखदूषिका या संस्कृत शब्दाचा अर्थ म्हणजे चेहरा दूषित करणारे. यालाच पर्यायाने युवानपिडका म्हटले आहे. जास्त करून तारुण्यावस्थेत उत्पन्न होणा-या असल्यानेच त्यांना युवानपिडका किंवा तारुण्यपीटिका असेही म्हटले जाते. यालाच आपण पिंपल्स म्हणतो. आयुर्वेदिक औचारामुळे पिंपल्स पूर्णपणे बरे होऊ शकतात.



पिंपल्सची कारणे...

मुखदूषिका उत्पन्न होण्याची मुख्यत: चार कारणे आहेत.

१) जेवणात तिखट, आंबट, खारट व मसालेदार पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन केल्यामुळे पित्त प्रकोप होऊन मुखदूषिका उत्पन्न होऊ शकतात.

२) तारुण्यावस्थेत मुलांचे रक्त सळसळत असते. म्हणजेच रागाच्या भरात टोकाची भूमिका घेत असतात. त्यामुळे पित्त प्रकोप होऊन पिंपल्स होऊ शकतात.

३) बाजारात मिळणा-या सौंदर्य प्रसाधनांचा अतिवापर केल्यामुळे चेह-यावरील त्वचा खराब होऊन पिंपल्स येऊ शकतात.

४) प्रदूषित हवामानामधून धूलिकण चेह-यावर चिकटतात. चेह-यावर अतिप्रमाणात घाम आल्यामुळे डोक्यातील केसांमधील कोंडा चेह-याला चिटकून अस्वच्छतेमुळे पिंपल्स होऊ शकतात.

कशी घ्याल काळजी?

१)जेवणात हिरव्या भाज्या, पोळी, वरण-भात, दूध, तूप असा सात्त्विक आहार घ्यावा.

२)आपल्या मानसिक रोगावर नियंत्रण व संयम ठेवणे. त्याच प्रमाणात नेहमी आनंदी व शांत राहण्याची वृत्ती बाळगावी. ३)रात्रीचे जागरण टाळावे.

# एकमेकांबद्दल क्षणोक्षणी विचार करा

कोणतीही गोष्ट शाश्वत नसते असे म्हटले जाते. नात्याच्या बाबतीतही हे खरे आहे. सुरुवातीला प्रेमाच्या नात्यामध्ये आपुलकी, जिव्हाळा, ओढ, काळजी या सर्व भावना ओतप्रोत भरलेल्या असतात. काळ पुढे सरकतो तशा या भावना हळूहळू बोथट होऊ लागतात. एकमेकांबद्दल क्षणोक्षणी विचार करणाऱ्या पती-पत्नीचे एकमेकांकडे दुर्लक्ष होऊ लागते. हे केवळ पती-पत्नीच्या बाबतीत नव्हे तर प्रियकर-प्रेयसीच्या बाबतीतही घडते. स्त्रिया जास्त भावूक असल्याने त्याचे आपल्यावर पूर्वीसारखे प्रेम उरलेले नाही हा विचार त्यंना सतातवत राहतो. मात्र, नात्याचा हा तिढा कसा सोडवावा हे उमगत नाही. पतीचे आपल्यावरील प्रेम पूर्णपणे संपुष्टात आलेले नसले तरी ते कमी झाले आहे, हे वारंवार जाणवते. अशा वेळी डोके धरुन बसण्यात काय अर्थ आहे?



चला, नात्याला थोडा ताजेपणा देऊ या! नात्यात तोचतोचपणा येण्याला दोघेही जबाबदार असतात. दोघांना एकमेकांना सतत दोष देण्याची सवय लागलेली असते. वारंवार दोष दिल्याने एकमेकेंबद्दल द्वेष निर्माण होऊ लागतो. हे टाळण्यासाठी सर्वप्रथम दोष देणे थांबवले पाहिजे. आपली चूक असेल तर ती मान्य करायला काय हरकत आहे? नात्यामध्ये कोणीही उच्च किंवा नीच नसल्याने मोकळेपणाने आपला दोष स्वीकारला तर जोडीदाराला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. त्याने माझ्यासाठी अमूक केले पाहिजे, ती माझी जबाबदारी नाही असे म्हणण्यापेक्षा प्रत्येक बाबीमध्ये दोघांनी समान वाटा उचलावा, म्हणजे एकावर दडपण येणार नाही. आणि एकमेकांच्या साथीने काम पूर्णही होईल. स्त्रियांना खूप बोलण्याची सवय असते. त्या स्वत:ची गाडी पुढे दामटवण्यात इतक्या रमतात की समोरच्याला काही बोलायचे आहे हे त्यांच्या लक्षातही येत नाही. यामुळेही नात्यात दरी निर्माण होऊ शकते. त्यामुळे आपले म्हणणे पुढे रेटण्यापेक्षा जोडीमाराचे म्हणणे ऐकून घेण्याचा प्रयत्न करावा.

# शरीराचा एखादा भाग दुखू लागल्यावर

शरीराचा एखादा भाग दुखू लागल्यावर अनेक जण वैद्यकीय सल्ला न घेता पेनकिलरच्या गोळ्या घेतात. हे योग्य नाही. अनेक वेळा हे दुखणे आजाराचा संकेत असू शकतो.



**पोटदुखी**

२००७ मध्ये गायनोकोलॉजिस्ट कॅन्सर फाउंडेशनने केलेल्या संशोधनानुसार पोटात दीर्घकाळापासून दुखणे, जेवण करताना त्रास, शौचावेळी दुखणे असा त्रास होत असल्यास ही ओवेरियन कॅन्सरची लक्षणे असू शकतात.

**काय करावे :** लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळीच उपचार केल्यास ९० टक्के समस्या दूर होते. त्याचप्रमाणे संबंधित दुखण्याचे कारण माहीत होते

**पाठदुखी :**

पाठदुखीसोबत पाय सुन्न होत असतील तर हे रक्तसंचार प्रभावित होण्याची लक्षणे असू शकतात. जेव्हा पाठीच्या कण्यावर दाब पडतो त्यावेळी ही लक्षणे दिसतात. पाठीच्या कण्यात पातळ डिस्कची भूमिका महत्त्वाची असते. हे डिस्क स्पंज कुशनप्रमाणे काम करतात.

**काय करावे :** ऑर्थोपेडिकचा सल्ला घ्यावा. घरगुती उपाय करण्याचे टाळावे. एक्स-रे किंवा एमआरआय चाचणी करून नेमका त्रास जाणून घ्यावा.

**पायदुखी**

पायाच्या पोटऱ्या दुखणे, सुजणे किंवा दुखणाऱ्या भागाची त्वचा लाल होणे ही लक्षणे डीपवेन थ्रोंबोसिसची असू शकतात. याला ब्लडक्लॉट(रक्तगुटळ्या) असे सुद्धा म्हणतात. जे लोक एकाच ठिकाणी बसून काम करतात त्यांना हा त्रास जास्त प्रमाणात होतो.

**काय करावे :** कामाच्या मध्ये थोडा ब्रेक घेतला पाहिजे. त्याचप्रमाणे नियमित अंतराने पाय मोकळे करावेत. गरजेनुसार बॉडी मसाज सुद्धा करावी.

**छातीत दुखणे**

छातीत जळजळणे किंवा दुखण्याचा त्रास खास करून तिखट जेवण घेतल्यानंतर होतो. हा त्रास हृदयरोगाचे कारण ठरू शकते. तुमचे वय ४५ पेक्षा जास्त असेल आणि असा त्रास सातत्याने होत असल्यास हृदय रोगाची शक्यता जास्त असते.

**काय करावे :** साधा आहार घेण्यासोबत नियमित व्यायाम करण्याची सवय लावावी. हृदयाची चाचणी करून घ्यावी.

# सेटल्ट ऑम्लेट

साहित्य:- चार अंडी, चार ते सहा मोठे कांदे, तेल तीन चार चमचे, लाल तिखट दीड चमचा, गरम मसाला, अर्धी वाटी कोथिंबीर, एक चमचा मोहरी, हळद, हिंग व मीठ चवीप्रमाणे.



कृती :- प्रथम कांदे बारीक चिरून घ्यावेत. पसरट भांड्यात तेल गरम करावे. त्यात मोहरी, हिंग घालून फोडणी करून घ्यावी. त्यावर चिरलेला कांदा घालून झाकण ठेवावे व कांदा वाफेवर चांगला शिजवून घ्यावा. कांदा चांगला शिजला की त्यात हळद, मीठ, लाल तिखट, गरम मसाला घालून तेल सूटेपर्यंत परतावे. त्यात थोडी कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करावे. त्यावर एक एक अंडे फोडून टाकावे. पण ती ढवळू नयेत. मंद आचेवर पाच मिनीटे शिजल्यावर त्यावर उरलेली कोथिंबीर घालून गरम गरम भाकरी किंवा पोळीबरोबर सर्व्ह करावे.

# हास्यविनोद



● **सोमू :** या पुणे शहरात माझ्या वडिलांनी पंधरा इमारती बांधल्या आहेत.

**गोमू :** अरे वा. पण तू असा भणंग का राहतोस?

**सोमू :** पैसे नाहीत म्हणून.

**गोमू :** पण तुझ्या वडिलांनी एवढ्या इमारती बांधल्या, त्याचं भाड मिळत असेल ना !


**सोमू :** कसं मिळेल आम्हाला?

**गोमू :** का ?

**सोमू :** अरे त्या पंधरा इमारतींवर ते गवंडी म्हणून कामाला होते.

● किर्तन चालू असतं. बुवा खड्या आवाजात बोलत असतात. एक मूल रडू लागतं म्हणून त्याची आई उठते आणि बाहेर जाऊ लागते. ते पाहून बुवा म्हणतात, बाई, नका नेऊ बाळाला बाहेर. मला नाही होत त्याचा त्रास त्यावर बाई म्हणातात, बुवा तुम्हाला नसेल होत त्रास, पण बाळाला होतोय म्हणून चाललेय.

# रात्रीच्या नाष्ट्यामुळे वजन वाढण्याची शक्यता



दिवसभर थोडे थोडे खाण्यापेक्षा रात्रीचा नाष्टा वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकतो, असे आढळून आले आहे. रात्रीच्या जेवणामुळे शरीरात मेदाचे प्रमाण वाढते, मात्र दिवसाच्या जेवणाचा उपयोग शरीरात इंधन म्हणून होतो.

शास्त्रांनी केलेल्या संशोधनात उंदरामध्ये शरीरातील साखर नियंत्रित करण्याची क्षमता असते, असे उघड झाले आहे. दैनंदिन चक्रात झोपेच्या व उठण्याच्या वेळेत बदल केल्यानंतर शरीरात अधिक मेद जमा होण्यास सुरुवात होते, असे लाईव्हसान्सचा अहवालात म्हटले आहे. रात्रपाळीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मधुमेह व लठ्ठपणाची समस्या का भेडसेवते, याची उकल या संशोधनात करण्यात आली आहे.

तुमच्या जैविक घड्याळातील वेळा बिघडल्यानंतर शररीरात मेद जमा होण्याची प्रक्रिया वाढते. असे व्हॅंडर्बिल्ट युनिव्हर्सिटीतील क्रोनोबायोलॉजिस्ट व संशोधन अहवालाचे कार्ल जॉन्सन यांचे म्हणणे आहे. तुम्ही काय खाता, यापेक्षा केव्हा खाता, हे महत्त्वाचे आहे.

# विवाह इच्छूक तरुण-तरुणींसाठी

लग्नाच्या गाठी या तर स्वर्गातच बांधल्या जात असतात, असे म्हटले जाते. योग जुळून आले तर लग्न जुळण्यास वेळ लागत नाही. परंतु काही तरुण- तरुणींच्या बाबतीत असे होत नाही. त्याचे लग्न जुळवण्यासाठी त्यांच्या पालकांना खूप परिश्रम घ्यावे लागतात. लग्न जुळल्यानंतर 'जमले एकदाचे' अशी म्हणण्याचीही वेळ त्यांच्यावर येत असते. तुमच्या घरातही असेच काही चित्र असेल तर हा लेख तुमच्यासाठीच आहे.

बृहस्पतीला सर्व देवांचा गुरु मानले गेले आहे. बृहस्पतीची नियमित पूजा केली तर लग्न जमण्यात येणा-या सर्व अडचणी समाप्त होतील.

भोले नाथ आपल्या भक्ताला कधीच निराश करत नाही. महादेवाला प्रसन्न करण्यासाठी प्रत्येक शनिवारी महादेव मंदिरात जाऊन काळे तीळ अर्पण करावे.

काळ्या गाईला हिरवा चारा खाऊ घालावा. रात्री झोपताना उशीखाली बडीशेप ठेऊन झोपावे. काळ्या कुत्रा पाळावा व त्याला स्वतःच्या हाताने खायला द्यावे.


सूर्य ग्रहामुळे लग्न जुळण्यात अनेक अडचणी निर्माण होत असतील तर दररोज सकाळी नियमित सूर्याला अर्घ्य द्या.

# आरशात चेहरा पाहून जाणून घ्या, नशिबात राज ऐश्वर्य आहे की दारिद्र्य

चेहरा व्यक्तीची ओळख असतो आणि चेहऱ्यावरील भाव व्यक्तीच्या मनातील गोष्ट सांगून जातो. काही लोक चेहऱ्यावरील भाव लपवण्याच्या कलेमध्ये माहीर असतात आणि स्वतःचा स्वार्थ साध्य करण्यासाठी खोट्या चेहऱ्यामागे खरा चेहरा लपवून ठेवतो. व्यावहारिक जीवनात हीच गोष्ट अनेकवेळा नुकसानदायक किंवा त्रासदायक ठरते. तर प्रत्येक मनुष्याच्या मनात उज्वल भविष्याची इच्छा आणि भविष्य जाणून घेण्याची लालसा कोणत्या न कोणत्या स्वरुपात अवश्य असते.

हिंदू धर्मग्रंथांमध्ये मनुष्य जीवन आणि भावना लक्षात घेऊन काही अशा गोष्टी सांगण्यात आल्या आहेत, ज्या मनुष्याला त्याच्या भविष्याचे चित्र दाखवतात आणि जगण्याची आशा कायम ठेवतात. भविष्य पुराणामध्ये पुरुषांच्या लक्षणासंबंधी काही गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. या गोष्टींवरून पुरुषाचा येणारा पुढील काळ, त्याचे आरोग्य, कुवत आणि दरारा कसा राहील हे समजू शकते.

भविष्य पुराणानुसार शिव पुत्र कार्तिकेयने पुरुषांचे लक्षणं सांगणाऱ्या 'लक्षणं' ग्रंथाची रचना केली होती. एकदा महादेवाने या ग्रंथाच्या आधारे स्वतःविषयी जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा कार्तिकेयने 'कपाली' म्हटल्यानंतर महादेव क्रोधीत झाले आणि त्यांनी 'लक्षण'



ग्रंथ समुद्रात फेकून दिला. काही काळानंतर हाच लक्षणं ग्रंथ पुरुषांसोबतच, स्त्रियांचे लक्षणं सांगणारा 'समुद्र' किंवा 'सामुद्रिक' ग्रंथ या नावाने प्रसिद्ध झाला.

जेव्हा कार्तिकेय स्वामींनी क्रौंच पर्वताला ध्वस्त केले तेव्हा ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन त्यांना वर मागण्यास सांगितले. तेव्हा कार्तिकेयने लक्षणं ग्रंथामध्ये स्वतःचा रचलेल्या पुरुष-स्त्री लक्षणांची माहिती जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा ब्रह्मदेवाने पुरुषांचे लक्षणं प्रामुख्याने सांगितले आहेत.

- वाघ, सिंह यासारख्या गालांचे पुरुष सर्व सुख आणि संपत्तीचे मालक व भाग्यशाली असतात. तर विद्रूप, वाकडा, आणि वाघासारखा चेहरा चोर व्यक्तीची ओळख आहे.

- सुंदर आणि प्रभावशाली हत्तीच्या मुखासमान भरलेल्या चेहऱ्याचा व्यक्ती राजा म्हणजे राजसी स्वभावाचा असतो. तर सोंडीसारखा चेहरा अशांरा व्यक्ती भाग्यहीन असतो.

- चंद्राच्या प्रकाशाप्रमाणे चमकदार आणि शांत चेहरा असणारा व्यक्ती धर्मात्मा असतो.

- वानरासमान चेहरा असणारा व्यक्ती धनवान असतो किंवा होतो.

- ज्या पुरुषाची नाभी खोल, स्वर गंभीर आणि अवयवांचे जोड मजबूत, मुख (चेहार), ललाट(कपाळ) आणि छाती रुंद असते. तो पुरुष राजऐश्वर्य प्राप्त करतो.

- ज्या पुरुषाचे नाक, नखं, तोंड लांब असते, पाठ, गळा आणि जांघ(मांडी) छोटी असते. डोळे, हात, पाय, टाळू, ओठ, जीभ लालीमायुक्त(लालसर) असतात. असा पुरुष शाही वैभवात आयुष्य जगतो.

# खाण्यात कांदा, लसूनचा समावेश करावा

खाण्या-पिण्याकडे लक्ष दिले नाही किंवा वेळेवर जेवण न घेतल्यास आपल्या 'सेक्स लाईफ'वर त्याचा विपरीत परिणाम दिसून येतो. जर आपल्याला ही समस्या भेडसावत असेल तर खालील गोष्टींचा आपल्या जेवणात समावेश करा आणि चमत्कार पाहा.



खाण्यात सॅलड आणि कांदा, लसूण, अद्रकाचे संतुलित सेवन करावे.

रोज मध, भिजवलेले बदाम, मनुका दूधाबरोबर सेवन करावे.

जेवणात प्रत्येक प्रकारच्या दाळींचा उपयोग करावा.

हिरव्या पालेभाज्यांचा जेवणात नियमितपणे वापर करावा.

फळ, सुका मेवा, अंकुरित पदार्थांचे सेवन करावे.

शाकाहाराचे सेवन केल्यास सेक्स ताकद वाढते असे, संशोधनात आढळून आले आहे.

प्रोटिनयुक्त पदार्थांचा जेवणात वापर करावा.

पिझ्झा, बर्गर, चॉकलेट, कोल्ड्रिंक्स आणि चाइनीज फूड खाणे टाळावे.

तेलकट, मसालेदार पदार्थांचे सेवन करू नये.

दिवसभरात किमान २000 कॅलरी मिळतील असे जेवण करावे. उडीद दाळींपासून बनवलेले पदार्थ खाण्यात वापरल्याने शक्ती वाढण्यास मदत होते.

अशक्तपणा वाटत असेल तर थंडीमध्ये नियमितपणे रात्री खजूराबरोबर दुधाचे सेवन करावे. नियमितपणे च्यवनप्राश घ्यावे.ार आवळ्याचे नियमित सेवन केल्यास तारूण्य कायम राहते.

# हास्यविनोद...

**गंपूचा दात !**

■ गंपू- माझा दात काल दुखत होता,

झंपू- हो का? मग अजून दुखतोय का दात?

गंपू- माहीत नाही रे... दात तर डॉक्टरांनी काढून त्यांच्याकडे ठेवला.

**बंड्याचा नेम**

■गंगूबाई : तुमच्या बंड्याने आमच्या बाळूस दगड फेकून मारला.

यमुनाबाई : बंड्याचा डोळा तर फुटला नाही ना?

गंगूबाई : अहो, कपाळाला खोक पडली म्हणून निभावले नाही, तर डोळाच फुटला असता.

यमूनाबाई : डोळा फुटला नाही ना? मग तो दगड माझ्या बंड्यानं मारला नाही. त्याचा नेम कधीच चुकत नाही.

# आता मलाही जमेल स्मार्टफोन !




■ **भाग ११ :**

**व्हॉट्सप कॉलिंग (Calling) लांबच्या प्रियजनांना समोर पहा**

भाग : व्हॉट्सप सुरक्षितता (Security) फसव्या मेसेज आणि कॉल्सपासून सावध राहा!

व्हॉट्सपवर दररोज हजारो मेसेज फिरत असतात. पण लक्षात ठेवा, स्क्रीनवर दिसणारा प्रत्येक मेसेज खरा नसतो. तुमची वैयक्तिक माहिती आणि पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी आजचा भाग नीट समजून घ्या.

१. फसव्या मेसेजची आणि लिंकची ओळख (Fake Links)

फसव्या लिंक्स कशा दिसतात? याचा एक नमुना खालीलप्रमाणे असू शकतो:

नमुना मेसेज : टाटा कंपनीच्या १५० व्या वर्षानिमित्त सर्वांना ३ महिन्यांचे रिचार्ज फ्री मिळत आहे! खालील लिंकवर क्लिक करा आणि तुमचे फ्री रिचार्ज मिळवा: http://tata-free-recharge.gift-offer.com घाई करा, ऑफर मर्यादित काळ आहे!

**अशा लिंक कशा ओळखाल?**

*** लिंकचे नाव नीट वाचा :** अधिकृत लिंक नेहमी www.tata.com अशी साधी असते. पण फसव्या लिंकमध्ये gift-offer, free-win, lottery असे शब्द जोडलेले असतात.

*** मोफतचे आमिष :** जिथे कुठे मोफत, बक्षीस किंवा लॉटरी असे शब्द असतील, तिथे शंका घ्या.

*** चुकीचे स्पेलिंग :** अशा मेसेजमध्ये अनेकदा व्याकरणाच्या किंवा शब्दांच्या चुका असतात.

२. 'Forwarded' मेसेजवर आंधळा विश्वास ठेवू नका

मेसेजच्या वर जर 'Forwarded' किंवा 'Forwarded many times' असे लिहिलेले असेल, तर त्याचा अर्थ तो मेसेज कोणीतरी लिहिला आहे आणि लोक तो फक्त पुढे पाठवत आहेत.

**खरा की खोटा :** तो मेसेज पुढे पाठवणाऱ्या व्यक्तीने स्वतः लिहिला नसल्यामुळे, त्यातील माहिती शंभर टक्के खरी असेलच असे नाही.

**अफवा :** आरोग्याबद्दलचे घरगुती उपाय, धार्मिक मेसेज किंवा भीती घालणारे मेसेज खात्री केल्याशिवाय पुढे पाठवू नका.

**सावधानता :** मेसेज वाचून घाबरून जाण्यापेक्षा तो मेसेज अधिकृत बातमीमध्ये (वृत्तपत्रात किंवा टीव्हीवर) आला आहे का, हे तपासा.

३. टू-स्टेप व्हेरिफिकेशन (Two-Step Verification) - सविस्तर माहिती

हे तुमच्या व्हॉट्सपला लावलेले एक 'भक्कम कुलूप' आहे. यामुळे जर कोणी तुमचा सिम कार्ड चोरले किंवा तुमचा ओटीपी (OTP) मिळवला, तरीही तो तुमचे व्हॉट्सप उघडू शकणार नाही.

हे कसे सुरू करायचे? (पायऱ्या):

१. व्हॉट्सपच्या Settings मध्ये जा.
२. लर्लेपीं या पर्यायावर क्लिक करा.
३. तिथे Two-step verification वर स्पर्श करा.
४. खालील 'Turn on' बटण दाबा.
५. आता तुम्हाला तुमच्या आवडीचा ६ आकडी पिन (PIN) टाकायला सांगतील. तो दोनदा टाकून सेट करा. (हा पिन कुणालाही सांगू नका).
६. त्यानंतर तुमचा ईमेल आयडी (Email ID) विचारतील. तो नक्की द्या, कारण जर तुम्ही पिन विसरलात तर ईमेलच्या मदतीने तो पुन्हा मिळवता येतो.
७. Save करा. आता तुमचे खाते पूर्णपणे सुरक्षित झाले आहे!

४. स्क्रीन लॉक (Screen Lock) - तुमचे मेसेज खासगी ठेवा

तुमचा फोन कोणाच्याही हातात गेला तरी तुमचे व्हॉट्सप मेसेज कोणी वाचू नयेत यासाठी तुम्ही टाळे (Lock) लावू शकता:

१. Settings Privacy मध्ये सर्वात खाली जा.
२. तिथे 'Fingerprint lock' किंवा 'App lock' असा पर्याय दिसेल, तो सुरू करा.
३. आता व्हॉट्सप उघडण्यासाठी तुम्हाला तुमचा अंगठा (Fingerprint) किंवा फोनचा मुख्य पिन वापरावा लागेल.

५. अनोळखी नंबरवरून येणारे व्हिडिओ कॉल्स

कधीकधी अनोळखी किंवा परदेशी नंबरवरून (उदा. +९२, +८४, +६२ ने सुरू होणारे) व्हिडिओ कॉल येतात.

*** धोका :** असे कॉल उचलल्यावर समोरून अश्लील काहीतरी दाखवून तुम्हाला ब्लॅकमेल केले जाऊ शकते.

*** उपाय :** अनोळखी नंबरवरून आलेला व्हिडिओ कॉल कधीही उचलू नका. तो नंबर लगेच 'इश्रेलज्ञ' करा.

६. नंबर 'Block' (ब्लॉक) आणि 'Report' (रिपोर्ट) कसे करायचे?

जर कोणी तुम्हाला त्रास देत असेल किंवा फसव्या मेसेज पाठवत असेल, तर:

१. त्या व्यक्तीचे चॅट उघडा.
२. वरच्या तीन ठिपक्यांवर क्लिक करून 'More' मध्ये जा.
३. तिथे 'Block' वर क्लिक करा. आता ती व्यक्ती तुम्हाला कधीही मेसेज किंवा कॉल करू शकणार नाही.
४. जर तो नंबर फ्रॉड असेल, तर 'Report and Block' निवडा. यामुळे व्हॉट्सप त्या नंबरची चौकशी करेल.

**७. मोठी टीप :** सायबर फसवणूक झाल्यास काय करावे?

जर तुमची किंवा तुमच्या ओळखीच्या कोणाचीही ऑनलाइन फसवणूक झाली, पैसे चोरीला गेले किंवा कोणी ब्लॅकमेल करत असेल, तर घाबरू नका:

**हेल्पलाइन नंबर :** लगेच १९३० (१९३०) या सायबर क्राईम हेल्पलाइन नंबरवर फोन करा.

*** वेबसाइट :** तुम्ही www.cybercrime.gov.in या सरकारी वेबसाइटवरही तक्रार करू शकता.

**आजचा गृहपाठ**

१. आजच तुमच्या फोनमध्ये Two-step verification आणि Screen Lock सेट करा.
२. सायबर क्राईमचा मदत क्रमांक १९३० तुमच्या फोनमध्ये सेव्ह करून ठेवा.
३. तुमच्या व्हॉट्सपवर आलेल्या जुन्या मेसेजमध्ये एखादी संशयास्पद लिंक दिसते का, हे तपासा.
४. तुमच्या यादीत एखादा नको असलेला नंबर असेल, तर त्याला Block करून पहा.

आजची स्मार्ट टिप

व्हॉट्सप किंवा तुमची बँक कधीही मेसेजवर तुमचा OTP (ओटीपी) किंवा PIN मागत नाही. कोणीही फोनवर अशी माहिती मागितली तर तो फसवणुकीचा प्रयत्न आहे हे ओळखा आणि फोन लगेच कापून टाका!

**पुढच्या भागात :** व्हॉट्सपमधील उपयुक्त सोयी - मेसेज डिलीट करणे, महत्त्वाचे चॅट वर पिन (Pin) करणे आणि बरेच काही!

■ धनश्री ए. बी.

# महिलांचे आरोग्याकडे होतेय दुर्लक्ष

पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी आजची महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत आहे, याचे स्त्रीरोग तज्ज्ञांकडून अनेक दाखले दिले जात आहेत. सकाळपासून रात्रीपर्यंत घर, नोकरीची जबाबदारी सांभाळणारी ही महिला 'फॅमिली केअरटेकर' बनली आहे. तरीही स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने तिला विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. महिलांच्या आरोग्यसमस्यांबाबत केलेला हा उहापोह...

एकविसाव्या शतकात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला काम करीत आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय असो की शैक्षणिक क्षेत्र महिलांनी पादाक्रांत केली आहेत. जगाच्या नकाशावर कोणतेही क्षेत्र आता बाकी राहिले नाही. ज्या क्षेत्रांमध्ये महिलांनी आपले राज्य गाजविले नाही. सर्व क्षेत्रात यश मिळविणारी ही महिला घर, नोकरी, संसार या तीन ही पातळ्यांवर जबाबदारी पेलत आहे. या जबाबदाऱ्या पेलताना त्यांची कसरत होत आहे. कसरत झाली तरी महिला मात्र मागे हटत नाहीत की हार पत्करत नाहीत. परंतु, या कसरतीमध्ये महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याचे आता दिसून येत आहे. बदलती जीवनशैली, धकाधकीचे जीवन, नोकरीसाठी होणारी धावपळ, ताणतणाव, बैठे कामाच्या पद्धती, त्यामुळे खाण्याच्या चुकीच्या सवयी, वेळेचा अभाव असल्याने व्यायामाकडे होणारे दुर्लक्ष यासारख्या विविध कारणांनी 'फॅमिली केअरटेकर' बनलेल्या महिलांचे आरोग्य दुर्लक्षित होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

'करिअर, नोकरी करण्याच्या प्रयत्नात अनेक महिला स्वतःकडे दुर्लक्ष करीत आहेत. करिअर करणारी कालची तरुणी लग्नानंतर विवाहिता बनली. पत्नी, आई म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या महिलेची भूमिका बदलली. पण पुरुषांची भूमिका बदलली नाही. त्यामुळे महिला सतत ओझ्याखाली राहतात. लवकर उठणे, स्वयंपाक करणे, मुलांचा सांभाळ करणे, तसेच नोकरी असेल तर ती जबाबदारी सांभाळणे या कामाच्या ओझ्याखाली महिला अडकल्या आहेत. त्यामुळे त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यावेसे वाटत नाही,' असे भारती हॉस्पिटलच्या स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. गिरीजा वाघ यांनी स्पष्ट केले. सातत्याने बैठे काम केल्याने त्यांचे वजन वाढत आहे. वजन कमी करण्यासाठी त्यांच्याकडून पुरेसे प्रयत्न होत नाहीत. अनेकदा नोकरीकडे अधिक लक्ष दिले जाते. हार्मोन्समधील बदलामुळे वागणूक, बोलण्यातही फरक पडतो हे कळत नाही, असेही निरीक्षण त्यांनी नोंदविले.

पूर्वीच्या आणि आताच्या महिलांच्या जीवनपद्धतीत फरक पडला आहे. पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडल्याने जीवनशैली बदलली आहे. अनेक महिला, तरुणी ताणतणाव कमी करण्यासाठी किंवा कंपनी म्हणून आपल्या मित्र मैत्रिणींसोबत धुम्रपान करताना दिसतात. मद्यसेवन करण्याचे त्यांच्यातील प्रमाण देखील वाढले आहे. या कारणांमुळेच महिलांमध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, थायरॉइडचे आजार, अनियमित मासिक पाळी, स्तनांसह गर्भाशयांच्या तोंडाचा कॅन्सर, हाडांचे आजार देखील वाढल्याची निरीक्षणे स्त्री रोग तज्ज्ञ नोंदवित आहेत.

## कशी मिळवाल चांगली झोप

कामावरून दमूनभागून घरी गेल्यानंतर दिवसभराचा थकवा दूर होऊन चांगली झोप मिळावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते.

हल्लीच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण दिनचर्येत अनेकांसाठी सुखाची झोप दुरापास्त झाली आहे. आरोग्यावरदेखील याचे विपरित परिणाम होतात. कामावरून दमूनभागून घरी गेल्यानंतर दिवसभराचा थकवा दूर होऊन चांगली झोप मिळावी, अशी प्रत्येकाची इच्छा असते.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१**
**दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५**
Web- www.mahapwd.gov.in e-mail- pune.eemahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ७२ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ ( दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी /२०१७/प्र. क्र. ०८/ इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी /२०१७/प्र. क्र.८/ इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी -२०१७ /प्र.क्र.८ / इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/ इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०४/इमा-२,दिनांक १४/२/२०२५ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून **रू. १००.०० लक्षपेक्षा जास्त किंमतीचे कामासाठी बी-१ नमुन्यातील निविदा** ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध/ऑनलाईन विक्री कालावधी आणि निविदा सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक २०/०२/२०२६ सकाळी १०.०० वा. ते दिनांक २७/०२/२०२६ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| **निविदा पुर्व चर्चा बैठक** | :- | दि.२३/०२/२०२६ रोजी वेळ सकाळी १२.०० वाजता. मा.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,पुणे,जुनी मध्यवर्ती इमारत,तळमजला, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा | :- | दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन कालावधी उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना) २.https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,पुणे-१ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

**सही/-**
**(प्रशांत शंकर खैरमोडे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पुणे ४११ ००१.**

**आरओसी-२०२५-२६/क्र-५/C६०१६**

# लग्न करण्यापूर्वी मुलीमध्ये तपासून घ्या, या गोष्टी

मनुष्य जीवनातील सोळा संस्कारामधील एक महत्त्वपूर्ण संस्कार लग्न आहे. सुखी वैवाहिक जीवनासाठी चांगला जोडीदार मिळणे आवश्यक आहे. लग्नासाठी अशा मुलीची निवड करावी, जी पतीची आणि कुटुंबाची प्रेमपूर्वक काळजी घेणारी असेल. विष्णू पुराणामध्ये स्त्रियांशी संबंधित विविध गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. या पुराणामध्ये कोणत्या ४ प्रकारच्या मुलींची लग्न करू नये याविषयी सांगितले आहे. येथे जाणून घ्या, या ४ मुली कोण आहेत...

**आई किंवा वडिलांच्या नात्यातील** : कोणत्याही व्यक्तीने आई किंवा वडिलांच्या नात्यातील मुलीशी लग्न करू नये. शास्त्रामध्ये नात्यामध्ये किंवा एकाच गोत्रात लग्न करणे वर्ज्य सांगण्यात आले आहेत. यामुळे जेनेटिक आजार होण्याची शक्यता राहते. ज्या मुलीचे आईच्या नात्यातील पाच पिढीपर्यंत आणि वडिलांच्या नात्यातील सात पिढीपर्यंत नाते जुळलेले असेल अशा मुलीशी लग्न करू नये.

**स्त्रीने दुष्ट पुरूषांशी जवळीकता वाढवू नये** : असे केल्यास ती केव्हाही एखाद्या संकटात सापडू शकते. दुष्ट पुरुष त्या स्त्रीचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करू शकतो. अशा पुरुषाच्या संगतीमध्ये राहिल्याने स्त्रीचा स्वभावही तसाच होतो. यामुळे तिच्या चारित्र्याला दोष लागू शकतो.

**पुणे महानगरपालिका, पुणे**
**निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग**
निविदा जाहिरात-नविन कामे

विक्री कालावधी दि :-२०/०२/२०२६ ९.०० सकाळी ते ०२/०३/२०२६ दु.०२.३० पर्यंत.
स्वीकृती दिनांक :-२०/०२/२०२६ ९.०० सकाळी ते ०२/०३/२०२६ दु.०२.३० पर्यंत.
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :-०३/०३/२०२६ दु.०३.०० वा.

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु | बयाणा रकम रु | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबादार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2025/ 663 | पाणीपुरवठा | कर्वेनगर सरगम कॉलनी पाण्याची जलवाहिनी दुरुस्ती करणे व नव्याने टाकणे. | रु.४१५/- | रु.८६१७४२/- | रु.८६१७/- | ३ | अपर्णा रवींद्र देसाई ९६८९९३६२०१ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असुन सदर कामाच निविदा संच https://mahatenders. gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृत सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असुन सर्व निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन न झाल्यास याची जबाबदारी टेंडरदाराची राहील
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपुर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा.येथे मिळेल.

जाहिरात क्र. १/१७३१
दिनांक :- १८/०२/२०२६

सही/-
Tender Clerk SNDT ws
टेंडर लिपिक
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

सही/-
Hemantkumar Vasantrao (Prabhari)
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**

Truhome FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

**प्रतिकात्मक ताबा सूचना**

जसे की , निम्नस्वाक्षरीदार हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात ) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह-कर्जदार / तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.
कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि सदर नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास ट्रूहोम फायनान्स लि. (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून खाली नमूद केलेल्या रकमेसाठी व्याजासह शुल्क आकारले जाईल.
सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी , उपलब्ध वेळेच्या संबंधात कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले आहे,

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्री.विनीत प्रकाश (कर्जदार)**
**२. श्रीमती रश्मी ओ विश्वकर्मा (सह-कर्जदार)**
**सध्याचा पत्ता: २०४ रॉयल रेझेंडेंसी,एसआर क्रमांक ८९बी १सी,प्राइम पॉइंट रोड, मोरे वस्ती मांजरी बीके पुणे, महाराष्ट्र-४१२३०७.तसेच: १००८ वर,१० वा मजला,सी विंग, अथर्वसृष्टी, दुसरा टप्पा, मांजरी खुर्द, पुणे, महाराष्ट्र-४१३३०७**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०९-१०-२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHPUNH0001641 अंतर्गत रु.१८,५९,६८१/- (रुपये अठरा लाख एकोणसाठ हजार सहाशे एकऍंशी फक्त)सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार दराने पुढील व्याजासह.
मागणी सूचना: १०/१०/२०२५, प्रतीकात्मक ताबा मिळण्याची तारीख: १६/०२/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

"यशल रेसिडेन्सी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील पाचव्या मजल्यावरील, "यशल रेसिडेन्सी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील, पाचव्या मजल्यावरील, तळेगाव दाभाडे येथे असलेल्या . तळेगाव दाभाडे येथील सी.टी.एस. क्रमांक ६०५४, ६०५५, ६०५६ या जमिनीपैकी एकूण ६२९.०४ चौरस मीटर जमिनीवरील ५९२.०१ +१६.०२+२१.०१ चौरस मीटर जमिनीवरील बांधकामे, ३०.५१ चौरस मीटर (कार्पेट क्षेत्रफळ) असलेले सर्व फ्लॅट क्रमांक ५०१, जे तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या स्थानिक हद्दीत आहे आणि पुणे जिल्हा, तालुका मावळ (यापुढे "सद फ्लॅट" म्हणून संदर्भित) येथील उपनिबंधक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात आहे. खालीलप्रमाणे सीमा:-पूर्वेकडे किंवा पूर्वेकडे: सपाट ५०२/पॅसेज. दक्षिणेकडे किंवा दक्षिणेकडे: सपाट ५०६/लिफ्टपश्चिमेकडे किंवा पश्चिमेकडे: बाजूचा कडा, उत्तरेकडे किंवा उत्तरेकडे: बाजूचा कडा

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**१. श्री. संतोष मोहन परदेशी (कर्जदार)**
**२. श्रीमती गीता संतोष परदेशी (सह-कर्जदार)**
**सध्याचा पत्ता: १/१७८ गणेश नगर, रवींद्र लॉंड्री जवळ, येरवडा, पुणे, महाराष्ट्र-४११००६. तसेच: फ्लॅट क्रमांक ३०५, विंग क्रमांक बी मध्ये, "अथर्व श्रुष्टी फेज ॥" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, लँड बेअरिंग गॅट क्रमांक ९९३,९९५,९९६,९९७,१०१८ वर बांधलेले, एकूण १४२६८ चौ.मीटरचे प्रशासकीय क्षेत्र, मांजरी खुर्द येथे स्थित. तालुका हवेली, जिल्हा पुणे- ४१२३०७**

**थकबाकी रक्कम**

दिनांक ०९-०९-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. STUHPUNH0001317. अंतर्गत रु.७,४७,०६८/- (सात लाख सत्तेचाळीस हजार अठ्ठासष्ट फक्त) आणि
दिनांक ०९-०९-२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SBTHPUNH0001238 अंतर्गत रु.१९,९८,६६४/- (रुपये एकोणीस लाख अठ्ठ्याण्णव हजार सहाशे चौसष्ट फक्त) सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, करारानुसारच्या दराने अतिरिक्त व्याजासह.
मागणी सूचना: ११/०९/२०२५
प्रतीकात्मक ताबा मिळण्याची तारीख: १६/०२/२०२६

**मालमत्तेचे वर्णन**

"अथर्व श्रुष्टी फेज ॥" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, तिसऱ्या मजल्यावर ५३३ चौरस फूट म्हणजेच ४९.५३ चौरस मीटर (कार्पेट एरिया) असलेला फ्लॅट क्रमांक ३०५, ८७ चौरस फूट म्हणजेच ८.०८ चौरस मीटरचा टेरेस, विंग क्रमांक बी मध्ये एकूण ६२० चौरस फूट कार्पेट एरिया, एकूण १४२६८ चौरस मीटरचा समावेश आहे. हे इमारतीचे बांधकाम गट क्रमांक ९९३,९९५,९९६,९९७,१०१८ या जमिनीवर बांधलेले आहे. हे इमारतीचे बांधकाम मांजरी खुर्द, तालुका हवेली, जिल्हा पुणे - ४१२३०७ येथे आहे. अंतर्गत सीमा -पूर्वेकडे: गट क्रमांक ९९७ भाग, दक्षिणेकडे: ग्रामपंचायत रस्तापश्चिमेकडे: मांजरी खुर्द गावठाण, उत्तरेकडे: गट क्रमांक ९९३ भाग

ठिकाण - पुणे
दि:- १६-०२-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार -ब**

वर्ष ११, अंक १८६ (४) सोमवार, डिसेंबर २९, २०२५ / पौष ८, शके १९४७ पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४७२
प्राधिकृत प्रकाशन
महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर, २०२५.
**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०११/प्र.क्र.२६२/ (भाग-६)/हवेली / रस्ते - ८. - ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम ४ च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम म्हणून करण्यात आला आहे) पुणे (पश्चिम) चक्राकार मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र. १ यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त महामार्ग असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (१९५५ चा ५५ ) याच्या कलम १५ च्या पोट कलम (२) व (३) व कलम १७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे,

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे;

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ७ अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हवेली, जिल्हा पुणे यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

**अनुसूची**
**संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन**

**तालुका : हवेली** **जिल्हा : पुणे**

| अ. क्र. | गाव | भूमापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर आर ) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | बहूली | गावठाण | ०.१००० |
| २ | बहूली | पोकळीस | ०.१२०० |
| ३ | रहाटवडे | वाडा | ०.२३९३ |
| ४ | रहाटवडे | गट क्र.१००३ | ०.०८०० |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
संदीप खलाटे,
शासनाचे उप सचिव.

**जिमाका/पुणे/जाहिरात/७७४/२०२५-२०२६**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे अनुकरण करा : जिल्हाधिकारी आंचल गोयल

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य, सुशासन, धैर्य आणि लोककल्याणाचा आदर्श घालून दिला, तो प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारावा असे मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 'लोककल्याण राजा अर्थात शिवदर्शन' या नाटकाचे आयोजन रविंद्र नाट्य मंदिर येथे करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या . या कार्यक्रमास पद्मश्री पुरस्कार विजेते उदय देशपांडे (आंतरराष्ट्रीय मल्लखांब प्रशिक्षक), अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय ९३ महाविद्यालये व शाळांमधील शिक्षक आणि ४०७ विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रास्ताविकात जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमी जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी प्रशासनाचा उल्लेख केला. तरुण पिढीने शिवरायांच्या आदर्शांचे अनुकरण करून समाज आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे, असे त्यांनी म्हटले.

पद्मश्री उदय देशपांडे यांनी काही देशांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज युद्धनीती आणि पराक्रमाचे धडे सैन्यदलांना दिले जातात, असे सांगत त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले आभार अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांनी मानले.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय, येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई टाऊन हॉल (सेंट्रल लायब्ररी), शहीद भगतसिंग रोड, फोर्ट येथून गेट वे ऑफ इंडिया पर्यंत पदयात्रा काढण्यात येणार आहे.

गेट वे ऑफ इंडिया येथे शिवरायांच्या जीवनपटावर आधारित विविध प्रयोगात्मक कला आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्य संचालनालय, तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# लंडनमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली भेट

जनप्रवास : प्रतिनिधी



पुणे : महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी लंडन येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भेट दिली. उपसभापती डॉ. गोऱ्हे सध्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या इंग्लंड अभ्यास दौऱ्यावर आहेत.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिल्पाला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतीला वंदन केले. केंद्र सरकारच्या नेहरू सेंटरचे श्री. रवींद्रचंद्रन यांनी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचा सत्कार केला. यावेळी, लंडन महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष वृषाल खांडके, वैभव खांडगे , केंद्र सरकारच्या नेहरू सेंटरचे श्री. रवींद्रचंद्रन, स्मारक व्यवस्थापक श्री. फहद, उद्योजिका अनुश्री चौगुले उपस्थित होते.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीत अभ्यास करून शिक्षण पूर्ण केले. महाराष्ट्र शासनाने या निवासस्थानाला शासकीय दर्जा दिला असून, येथील व्यवस्था शासनातर्फे उत्तम राखली जात आहे. स्मारकाची देखभाल, सुशोभीकरण अधिक समृद्ध करण्यासाठी आणि येथील कर्मचारी वर्गास मान्यता देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. या स्मारकाच्या गौरवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट, केंद्रीय समाज कल्याण राज्य मंत्री रामदास आठवले व निवृत्त सरन्यायाधीश भूषण गवई यांचे सतत लक्ष असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी अधोरेखित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (इडए) मध्ये शिक्षण घेत असताना १९२१–२२ या काळात ज्या घरात वास्तव्य केले होते, ते घर आता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हाऊस' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने २०१५ मध्ये हे घर खरेदी करून स्मारकात रूपांतरित केले आहे. हे स्मारक किंग हेन्रीज रोड, कॅम्डन, लंडन येथे आहे. येथे बाबासाहेबांच्या जीवनातील छायाचित्रे, काही वैयक्तिक वस्तू आणि त्यांच्या कार्याचे प्रदर्शन घडते. डॉ. आंबेडकर यांच्या स्मारकाचे महत्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

# सर जे जे रुग्णालय येथे अत्याधुनिक आरोग्य सुविधांचे लोकार्पण

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुंबई येथील सर जे. जे. रुग्णालय समूहात विविध अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांचे लोकार्पण करण्यात आले. या नव्या सुविधा रुग्णसेवेची गुणवत्ता वाढविण्यासोबतच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शैक्षणिक व नैदानिक प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.

समारंभात बोलताना मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रुग्णसेवा बळकटीकरणासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांमुळे रुग्णांच्या उपचाराच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होईल, असे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण विभागाचे मुख्य ध्येय गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षणासोबत उत्कृष्ट व परवडणारी आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे हे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. उद्घाटन समारंभास राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार मनोज जमसुतकर, प्रधान सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी तसेच वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीने; अचूकतेसह राष्ट्रीय मानकांचे पालन व्हावे : जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई: जनगणना हा विकास नियोजनाचा भक्कम पाया आहे. जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीने होणार असून ती अचूक, पारदर्शकपणे करताना राष्ट्रीय मानकांचे पालन करून वेळेत पूर्ण करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज व्हावे, असे आवाहन महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त यांनी जनगणना २०२७ च्या अनुषंगाने आयोजित राज्यस्तरीय सम्मेलनात केले.

सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झालेल्या या संमेलनात महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त, मृत्युंजयकुमार नारायण व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. या परिषदेस अतिरिक्त मुख्य सचिव सीमा व्यास, संचालक तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, डॉ. निरुपमा जे. डांगे यांच्यासह विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महारजिस्टार व जनगणना आयुक्त मृत्युंजयकुमार नारायण यांनी जनगणनेचे घटनात्मक महत्त्व सांगत, लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेसह वित्त आयोगाच्या शिफारशी आणि केंद्र–राज्यांच्या अनेक योजनांचा पाया जनगणना आकडेवारीवर आधारित असल्याचे सांगितले. त्यामुळे संकलित होणारी माहिती गुणवत्तापूर्ण व विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. २०११ नंतर १६ वर्षांनी ही जनगणना होत आहे. त्यामुळे जनगणना २०२७ मध्ये सहभागी असणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या स्पष्टपणे निश्चित करण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल म्हणाले, जनगणना २०२७ अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने राबविण्यात येणार आहे. यामध्ये संकलित होणारी माहिती, डेटा प्रधानमंत्री जन आरोग्य योजनासारख्या अन्य विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे माहिती, डेटा अचूक होण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांच्यासह या प्रक्रियेत काम करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांची जबाबदारी महत्वाची आहे.

जनगणना २०२७ ची प्रक्रिया केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पडणार आहे. सुमारे २.६४ लाख प्रगणक व पर्यवेक्षक त्यांच्या मोबाईल उपकरणाद्वारे माहिती थेट जनगणना व्यवस्थापन व देखरेख प्रणालीत नोंदवली जाईल. त्यामुळे माहिती संकलनातील विलंब टळणार आहे. तसेच नागरिकांनाही प्रगणक येण्यापूर्वी स्व–गणना सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले.

अतिरिक्त मुख्य सचिव, सीमा व्यास यांनी सांगितले, जनगणना २०२७ दोन टप्प्यांत होणार असून पहिला टप्पा म्हणजे घरयादी व घरगणना १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान राबविण्यात येणार आहे. त्यापूर्वी १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वयं–गणनेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यात जनगणना २०२७ ची तयारी अंतिम टप्प्यात आली असून प्रशिक्षण प्रक्रिया सुरू असल्याचे त्या म्हणाल्या.

श्रीमती व्यास म्हणाल्या, जनगणना २०२७ पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे. यामुळे प्रक्रिया जलद, अचूक आणि पारदर्शक होईल. २०११ मध्ये कागदी पत्रकांद्वारे माहिती संकलित करण्यात आली होती; मात्र यावेळी तंत्रज्ञानाच्या मदतीने जनगणना प्रक्रियेतील त्रुटी कमी होऊन ही प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनगणना ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती आणि सर्वसमावेशक विकासाचा पाया असल्याचे डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी यावेळी सांगितले.

# मुंबई क्लायमेट वीकमध्ये अंतराळवीर राकेश शर्मा व शुभांशू शुक्ला यांचा विद्यार्थ्यांना शाश्वत जीवनशैलीचा संदेश

जनप्रवास : प्रतिनिधी




मुंबई : अंतराळातून पाहिल्यावर देश, शहर किंवा सीमा यांची ओळख मागे पडते आणि पृथ्वी हीच आपली ओळख वाटते, अशी भावना अंतराळातून पृथ्वीकडे पाहताना निर्माण झाल्याचा अनुभव भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा व नुकतेच अंतराळस्थानकावर जाऊन आलेले अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी सांगितला.

भारताच्या पहिल्या मुंबई क्लायमेट वीकमध्ये अवकाश, पर्यावरण आणि मानवी जबाबदारी यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. देशाचे दोन अवकाशवीर राकेश शर्मा आणि शुभांशू शुक्ला सारे जहाँ से अच्छा या विशेष सत्रात प्रथमच एका मंचावर एकत्र आले. क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते दोघांचा सत्कार करण्यात आला. विविध शाळांतील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेत अवकाशवीरांशी थेट संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार गौरव सावंत यांनी केले.

अंतराळवीर राकेश शर्मा यांनी अंतराळातून पृथ्वी पाहताना झालेल्या अनुभूती सांगताना प्रदूषणाचे गंभीर परिणाम अधोरेखित केले. पृथ्वीचा निळसर रंग कमी होत करडेपणा वाढल्याचे निरीक्षण त्यांनी मांडले. हे केवळ दृश्य बदल नाही, तर आपल्या पर्यावरणीय स्थितीचे स्पष्ट संकेत आहेत, असे ते म्हणाले. अंतराळातून पाहिलेल्या जंगलाच्या आगी, धुराचे प्रचंड ढग आणि पसरलेले प्रदूषण यामुळे पृथ्वीवरील प्रत्येक कृती जागतिक परिणाम घडवते, हे स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

पृथ्वीचे वातावरण आपल्याला हानिकारक किरणांपासून वाचवते; मात्र मानवी हस्तक्षेपामुळे ही संरक्षक ढाल कमकुवत होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. जंगलतोडीमुळे मातीची धूप, समुद्री जीवनावर होणारा परिणाम आणि परिसंस्थेतील असंतुलन यांचा साखळी परिणाम हवामान बदलाला गती देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महात्मा गांधींच्या विचारांचा उल्लेख करत शर्मा म्हणाले, पृथ्वी प्रत्येकाच्या गरजेसाठी पुरेशी आहे; परंतु प्रत्येकाच्या लोभासाठी नाही. संसाधनांचा अतिरेक, असमान वितरण आणि विकासाच्या नावाखाली होणारे पर्यावरणीय नुकसान भविष्यातील संघर्षांचे कारण ठरू शकते, असे त्यांनी सांगितले. शाश्वत विकास, जागतिक सहकार्य आणि न्याय्य संसाधनवाटप हीच शांततामय भविष्यासाठीची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# यावर्षाअखेर एसटी आर्थिकदृष्ट्या सुदृढ होणार; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा विश्वास

## यंदा तब्बल ८,३०० नवीन बसेस ताफ्यात दाखल होणार

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : दैनंदिन १ ते १.५ कोटी रुपयांची तूट सहन करत आर्थिक दडपणाखाली असलेल्या एसटीला नवसंजीवनी देण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. बसेसची कमतरता हा मुख्य अडथळा दूर करत यंदा तब्बल ८,३०० नवीन बसेस ताफ्यात सामील करण्याचा निर्धार परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. बसेस वाढल्या तर प्रवासी वाढतील, आणि प्रवासी वाढले तर उत्पन्न आपोआप वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कोरोना महामारीपूर्वी एसटीकडे १८ ते १९ हजार बसेस होत्या. दररोज सुमारे ६६ लाख प्रवासी एसटीने प्रवास करत होते. मात्र महामारी आणि दीर्घकालीन कर्मचाऱ्यांच्या संपामुळे गेल्या चार–पाच वर्षांत बसखरेदी रखडली. परिणामी २०२४ अखेर बसेसची संख्या घटून सुमारे १२,६०० वर आली. दरम्यान, राज्य शासनाने महिलांना तिकिटात ५०% सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास दिल्याने प्रवाशांचा ओघ पुन्हा वाढू लागला. सध्या दररोज सुमारे ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात; मात्र अनेक मार्गांवर फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत.

एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढील काही वर्षांत २० ते २५ हजार बसेस खरेदी करण्याचा मानस आहे. त्यास राज्य शासनाची तत्वत: मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८,३०० बसेस दाखल होणार आहेत. त्यामध्ये ३,००० '३२' आसन रचनेच्या ५५ आसनी बसेस मार्चपासून टप्प्याटप्प्याने दाखल होतील. या बसेसना 'राजमाता जिजाऊ साहेब' यांचे नाव देण्यात आले असून दोन शहरादरम्यान गर्दीच्या मार्गांवर धावतील.

## कला विश्व

# हृतिकमुळे बॉयफ्रेंडने १५ किलो वजन कमी केले होते : मृणाल ठाकूर



अभिनेत्री मृणाल ठाकूर आणि धनुष यांच्या लग्नाच्या अफवा सोशल मीडियावर पसरल्या होत्या. याच दरम्यान, मृणालने तिच्या आगामी 'दो दिवाने शहर में' या चित्रपटाच्या प्रमोशनवेळी नात्यांमधील इनसिक्युरिटी म्हणजेच असुरक्षितता या विषयावर तिने तिचं मत व्यक्त केलं. तसेच मृणालने तिच्या एका जुन्या नात्यातील मजेशीर पण गंभीर किस्सा सांगितला. मृणाल हृतिक रोशनबरोबर 'सुपर ३०' चित्रपटाचे शूटिंग करत होती, तेव्हा ती रिलेशनशिपमध्ये होती. तिचा बॉयफ्रेंड परदेशी होता, तो इनसिक्योर झाला होता. मृणाल म्हणाली, त्याला वाटलं की मी हृतिक रोशनसारख्या खूप देखण्या हिरोबरोबर काम करतेय आणि त्याच्याबरोबर वेळ घालवतेय. त्यामुळे त्याने स्वत:हून वर्कआऊट सुरू केले आणि चक्क १५–१७ किलो वजन कमी करून बॉडी बनवली. नंतर काही काळाने त्याने व्यायाम करणं सोडून दिलं. तो खूप खाऊ लागला आणि त्याचं वजन २० किलोने वाढलं. जेव्हा मी त्याला विचारलं की हे काय सुरू आहे? तेव्हा तो म्हणाला, 'मी त्याच्यासारखं दिसण्यासाठी हे सगळं करून आता थकलो आहे.' मृणाल ठाकूर पुढे म्हणाली, मी त्याला कधीच वजन कमी करायला सांगितले नव्हतं, पण हृतिकसारख्या देखण्या हिरोबरोबर काम करतेय, या विचाराने त्याच्या मनात असुरक्षितता निर्माण झाली होती.

दरम्यान, मृणालने तिच्याबद्दल अलीकडेच पसरलेल्या अफवांवर प्रतिक्रिया दिली. मृणालचं नाव दाक्षिणात्य अभिनेता धनुषशी जोडलं गेलं. इतकंच नाही तर तिच्या व धनुषच्या लग्नाचा दावा करणारा एक व्हिडीओही व्हायरल झाला होता. या व्हिडीओत बरेच सेलिब्रिटी असल्याचंही दाखवण्यात आलं होतं. हे सगळं भयंकर असल्याचं मृणालने म्हटलं. बोलताना मृणाल म्हणाली, मला वाटतं १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे असतो, तो आता १ एप्रिल म्हणजे एप्रिल फूल डे झाला आहे. कारण हे कोणी सुरू केलं मला माहित नाही. माझ्या नावाने काही खोट्या गोष्टी छापल्या जात आहेत, ज्याबद्दल मी कधीच बोलले नाही. गेल्या महिन्यात मृणाल आणि धनुष यांचे लग्न झाल्याचा एक –ख निर्मित व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. त्याबद्दल ती म्हणाली, हे खूप भीतीदायक आहे. फक्त व्ह्यूज मिळवण्यासाठी लोक अशा गोष्टी करत आहेत. धनुषने मृणालच्या सन ऑफ सरदार २ च्या स्क्रीनिंगला हजेरी लावली होती, तेव्हापासून तिच्या व धनुषबद्दल या अफवा पसरल्या होत्या.

# तू माझ्या यशामागचं रहस्य, दाक्षिणात्य सुपरस्टार चिरंजीवी यांची पत्नीसाठी पोस्ट



अनेकदा असं म्हटलं जातं की कलाकाराच्या यशामागे त्याच्या कुटुंबीयांची, जोडीदारीचीही मेहनत असते आणि त्यांच्या पाठिंब्यामुळे ते निर्धास्त होऊन काम करू शकतात. बऱ्याचदा कलाकार मंडळी त्यांच्यामागे ठामपणे उभे राहणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांचे आभारही मानत असतात. अशातच आता लोकप्रिय दाक्षिणात्य अभिनेते चिरंजीवी यांनीसुद्धा सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार चिरंजीवी हे नेहमी कुठल्या न कुठल्या कारणांमुळे चर्चेत असतात. आतापर्यंत त्यांनी अनेक चित्रपटांत दमदार भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर त्यांच्या अभिनयाची छाप सोडली आहे. दक्षिणेत त्यांचे लाखो चाहते आहेत. सोशल मीडियावर ते कायम सक्रिय असून एक्स(ट्विटर)वरून अनेकदा त्यांच्या प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. अशातच आता त्यांनी त्यांच्या पत्नी सुरेखा यांच्या वाढदिवसानिमित्त पोस्ट शेअर करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. ट्विट म्हणजे आताच्या एक्सवर चिरंजीवी यांनी पत्नीला शुभेच्छा देत आभार मानले आहेत. त्यांच्याबरोबरचे काही खास फोटोही शेअर केले आहेत. या फोटोंमधील एका फोटोत ते एकमेकांना भरवताना दिसत आहेत, तर त्यांच्या तारुण्यातील काही खास फोटोही पाहायला मिळत आहेत. पत्नीचं कौतुक करत चिरंजीवी म्हणाले, वाढदिवसाच्या शुभेच्छा प्रिय सुरेखा. २० फेब्रुवारी १९८० मध्ये आपलं लग्न झाल्यापासून तू माझी ताकद बनून माझ्यासोबत आहेस. आज तुझा वाढदिवस साजरा करत असताना लवकरच येणाऱ्या आपल्या लग्न वाढदिवसाच्याही तुला शुभेच्छा देतो. चिरंजीवी यांनी पुढे त्यांच्या पत्नीचं कौतुक करत त्या त्यांच्या यशाचं रहस्य आहेत असंही म्हटलं आहे. पत्नी सुरेखाबद्दल ते पुढे म्हणाले, तू आपल्या कुटुंबातील महत्त्वाची व्यक्ती आहेस. सगळ्यांना तू प्रेमाच्या धाग्यात बांधून ठेवलं आहेस. प्रत्येकाच्या पाठिशी तू प्रत्येक प्रसंगात उभी असतेस आणि माझ्या आई–वडिलांचीही तू मुलगी झालीस. जर कोणी मला माझ्या यशाचं रहस्य विचारलं तर ती माझी कला किंवा मेहनत नाही तर तू आहेस, कारण तू प्रत्येक जबाबदारी उत्तमरित्या पार पाडतेस, ज्यामुळे मला माझ्या कामाकडे लक्ष देता येतं. चिरंजीवी यांनी पुढे पत्नी सुरेखा यांचे आभार मानत आज ते जे काही आहेत ते त्यांच्या पत्नीमुळेच असंही म्हटलं आहे. प्रत्येक सुखाच्या, दु:खाच्या प्रसंगात तू आम्हा सगळ्यांच्या मागे ठामपणे उभी असतेस, त्यामुळे आपला लग्नाचा वाढदिवस जवळ येत असताना मला तुला सांगायचं आहे की, आज मी जे काही आहे ते फक्त तुझ्यामुळे.

* मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे–४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com